# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## शुक्रवार, दिनांक २१ मार्च, २०२५

## (सकाळी ०९.४५ ते १०.४५ वाजेपर्यंत)

**लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(मंगळवार, दिनांक १८ मार्च, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १)**

**(१) श्रीमती सना मलिक, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई महानगर प्रदेश (एमएमआर), विशेषतः देवनार, गोवंडी, वाशी नाका, तुर्भे आणि एम/पूर्व विभागातील मोठ्या प्रमाणावर चालू असलेल्या रेडी मिक्स काँक्रीट (आर.एम.सी.) प्लांट्स यांसाठी शासनाच्या पर्यावरण विभागाकडून मंजुरी घेणे बंधनकारक असताना, आर.एम.सी. प्लांट्स नियमांचे उल्लंघन करून सुरू असणे, नियमानुसार ५०० मीटरच्या आत निवासी भागात आर.एम.सी. प्लांट्स चालविता येत नसणे, तरीही या अटींचे सर्रास उल्लंघन केले जात असणे, अणुशक्ती नगर मतदारसंघातील एम/पूर्व विभागातील, न.भु.क्र. ६०० (पै.), गाव - माहुल, चेंबूर येथील एल. यू. गडकरी मार्ग आणि न.भु.क्र. ७४A/३C, ७४A/२ (पै.), गाव - देवनार, गोवंडी येथे कार्यरत प्लांट्समुळे परीसरात मोठ्या प्रमाणावर प्रदूषण वाढलेले असणे, बृहन्मुंबई महानगरपालिका (BMC) आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) यांच्याकडे वारंवार तक्रारी करूनही त्याकडे दुर्लक्ष केले जात असणे, परिणामी वाढत्या प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असणे, यामुळे जनतेत पसरलेला असंतोष लक्षांत घेता शासनाने याप्रकरणी चौकशी करुन करावयाची कायदेशीर कार्यवाही तसेच ज्या अधिकाऱ्यांच्या परिक्षेत्रात प्लांट्स सुरु असणे त्यांच्यावर देखील शासनाने करावयाची कारवाई व प्रतिक्रीया."

**(गुरुवार, दिनांक २० मार्च, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक २ व ३)**

**(२) श्री. गोपिचंद पडळकर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील देवस्थान इनाम जमिनी शेकडो वर्षापासून शेतकरी कसत असून त्या देवस्थानची सेवा व त्या जमिनीतील उत्पन्न देवाला देत असणे, गत काही वर्षांमध्ये

अप्रकाशित

शासनाने देवस्थान इनाम जमिनी कसणाऱ्या शेतकऱ्यांच्या नोंदी ७/१२ व ८/अ मधून कमी करुन इतर हक्कांमध्ये टाकण्यात आल्या असणे, देवस्थान इनाम जमिनी कसणाऱ्या शेतकऱ्यांच्या नोंदी कमी केल्यामुळे शेतकऱ्यांच्या पुढे अनेक अडचणी निर्माण झाल्या असणे, शेतकऱ्यांची नावे इतर हक्कामध्ये टाकल्यामुळे शेतकऱ्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळत नसणे, तसेच वक्फ सत्ता बाधित प्रकार अशी उताऱ्यावरील नोंद रद्द करावी व मूळ नांवे कब्जदार सदरी नोंद करण्यात यावी, राज्यात सर्वधर्मीय देवस्थान इनाम जमिनी वर्ग ३ मधून वर्ग १ करुन म्हणजे खालसा करुन कसणाऱ्या शेतकऱ्याला त्या जमिनीचा मालक करावे याबाबतची मागणी शेतकरी संघटना व लोकप्रतिनिधींनी शासनाकडे अनेकवेळा केली असणे, त्यासोबत मराठवाड्यातील देवस्थान व इनाम वर्ग २ च्या जमिनी वर्ग १ करणेबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे पश्चिम महाराष्ट्रातीलही देवस्थान व इनाम वर्ग २ च्या जमिनी वर्ग १ करण्याबाबत शासनाने निर्णय घेण्याची मागणी तसेच महाराष्ट्रातील वतनी जमिनीचा शहरी भागातील शर्तभंग माफ करणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे केली असणे, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) श्रीमती मोनिका राजळे, श्री. शिवाजी कर्डिले, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"अहिल्यानगर जिल्हयातील २५ पेक्षा अधिक ठिकाणी सरकारी जमिनीवर बळजबरीने ताबा घेऊन अनधिकृत अतिक्रमण केलेले असणे, सदर जमिनीवर बहुतांशी ठिकाणी विना परवानगी अनधिकृत बांधकाम केलेले असणे, यापैकी बहुसंख्य अतिक्रमीत बांधकामे धार्मिक स्वरुपाची असणे, सदर धार्मिक स्थळे बांधण्यापूर्वी गृहविभागाची कोणतीही पूर्व परवानगी घेतलेली नसणे, सदर धार्मिक स्थळामध्ये बळजबरीने धर्म परिवर्तन केलेल्या बाबी निदर्शनास येणे, सदरच्या सर्व विनापरवाना अनधिकृत बांधकामांबाबत संबंधित सरकारी आस्थापनाकडे वारंवार तक्रारी दिलेल्या असणे, परंतू संबंधित सरकारी आस्थपनेकडून कोणतीही कार्यवाही केलेली नसणे, प्रशासनाच्या अनास्थेमुळे मोकळया सरकारी जागांवर अतिक्रमण करण्यास प्रोत्साहन मिळत असणे, सदरची अतिक्रमणे धार्मिक स्वरुपाची असणे, यातील काही अतिक्रमित जागांमध्ये बळजबरीने धर्म परिवर्तन आणि अवैध धंदे होत असणे, यामुळे सामाजिक तेढ निर्माण होणे, त्यामुळे सामाजिक सलोखा, शांतता बिघडत असणे, सदरचे अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत अनास्था दाखवणाऱ्या, टाळाटाळ करणाऱ्या संबंधित प्रशासकीय अधिकारी यांच्यावर कारवाई होण्याची आवश्यकता असणे. सदर सर्व अतिक्रमणे निष्कासित करुन सर्व सरकारी जागा शासनाने ताब्यात घेण्याची कार्यवाही करणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(४) श्री. देवराव भोंगळे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"जिवती जिल्हा चंद्रपूर येथील १९७२ व १९९१ मध्ये महसूल विभागाने तालुक्यातील ओबीसी व अन्य प्रवर्गातील नागरिकांना भोगवटा २ च्या शेतीचे पट्टे दिले असणे, मात्र ही जमीन वन घोषित केल्याने फेरफार होऊ शकलेले नसणे, परिणामी पिण्याचे पाणी, शेतीचे पट्टे, अकृषक जमिनीची प्रकरणे, उद्योगधंदे, फेरफार, नवीन शेतीचे पट्टे, शाळा इमारत बांधकाम व दुरुस्ती, आदी कामांवर प्रतिबंध आल्याने नागरिकांची मुस्कटदाबी होत असणे, तालुक्यातील जिवती, गुडशेला व कोदेपूर येथील लघुसिंचन तलावाच्या कामास २०१४-१५ मध्ये सुरुवात झाली असणे, माणिकगड पहाडावरील काही भागातील शेतीसाठी सिंचनाची सोय होऊन पिकासाठी वरदान ठरणार असे शेतकऱ्यांना वाटत असणे, मात्र संपूर्ण जमीनच वन विभागाची असल्याचा निर्णय उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिल्यामुळे सुरू असलेली विकासकामे न होणे, लघुसिंचन तलावाला ग्रहण लागलेले असणे, तलावासाठी ज्या शेतकऱ्यांची शेती गेली त्यांना आजपर्यंत मोबदलाही मिळात नसणे, शासनाने ग्रामीण भागासह नागरी भागातही आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्यांना हक्काचा निवारा मिळावा म्हणून पंतप्रधान आवास योजना सुरू असणे, दि. १७ जून २०१५ रोजी नगरपंचायत जिवतीची स्थापना झाली असणे, जिवती ग्रामपंचायत असतानाही पात्र लाभार्थ्यांना घरकुल योजनेचा लाभ मिळत नसणे, ६६४ पात्र लाभार्थ्यांपैकी एकालाही लाभ मिळालेला नसणे, शासनाने या भागातील लोकांना तातडीने त्यांच्या हक्काची जमीन देण्याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(गुरुवार, दिनांक २० मार्च, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक ५ ते १५)**

**(५) श्री.उत्तमराव जानकर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"भोर (जि.पुणे) तालुक्यात नीरा देवघर प्रकल्पामधील शिल्लक राहणाऱ्या किंवा बचत झालेल्या पाणी साठयामधून कायमस्वरुपी दुष्काळी असलेल्या माळशिरस, सांगोला, खंडाळा, पंढरपूर आणि फलटण तालुक्यातील दुष्काळग्रस्त गावांना प्रत्येकी ०१ टी.एम.सी.असे एकूण ०३ टी.एम.सी. पाणी बंदिस्त पाईपलाईनद्वारे नातेपुते येथून नीरा उपसा कालव्यात सोडण्यात यावे अशी मागणी तेथील लोकप्रतिनिधींनी केली असणे, त्याचप्रमाणे राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीकडून नीरा देवघर प्रकल्पास मिळालेली मान्यता, तसेच उजनी धरणाचा गाळ काढून त्याच्यातील पाणी वाटा २-३ टी.एम.सी. करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी केली असून उजनीचा गाळ काढला तर २० टी.एम.सी. पाणी वाढण्याची शक्यता असणे, माळशिरस मतदारसंघातील १०० वर्षांहून अधिक जुन्या तलावांमध्ये ८ ते ९ टी.एम.सी. गाळ असणे, देवघर योजनेची सुरळीत अंमलबजावणी

झाली तर तलावातील गाळामुळे वापरासाठी शेतकऱ्यांना माफक पाणी मिळणार नसणे, नीरा देवघर प्रकल्पाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसणे, सदरहू प्रकल्पाच्या उर्वरित कामांची किंमत रु.३०८० कोटी असून सन २०२५-२६ च्या आर्थिक वर्षात निधीचे नियोजन करुन निधी उपलब्धतेनुसार कामांच्या निविदा काढण्यास मान्यता मिळणे आवश्यक असणे, तरच प्रकल्पाचे उर्वरित काम जलद गतीने पूर्ण होण्यास मदत होणार असून माळशिरस, सांगोला, खंडाळा, पंढरपूर आणि फलटण या तालुक्यातील दुष्काळी भागातील गावांना न्याय मिळावा यासाठी राज्य शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(६) श्री.राहूल कुल, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"संपूर्ण राज्यासह दौंड (जि. पुणे) तालुक्यातील चिबड, पाणथळ व क्षारयुक्त जमिनींचे प्रमाण वाढलेले असणे, उक्त शेतजमिनींचे सर्वेक्षण करून त्यास मान्यता मिळणेबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी केली असणे, पाझर चर करण्यासाठी मापदंड निश्चित नसल्याने, उक्त प्रस्तावास मान्यता मिळणे आवश्यक असणे, कॅनॉल व नदीक्षेत्र यासाठी वेगवेगळी धोरणे असणे, नदीक्षेत्रात क्षारपड जमिन सुधारणेकरीता २०% लाभार्थ्यांचा हिस्सा रद्द करून १००% अनुदान शेतकऱ्यांना देणेबाबतची मागणी असणे, अनेक शेतकरी बंदिस्त पाझरचर करण्यासाठी इच्छुक असून त्यासाठी धोरण नसल्याने अनेक अडचणी येत असणे, त्यासाठी देखील मापदंड ठरविणे आवश्यक असणे, मुळामुठा व भीमानदीवर अनेक कोल्हापुर पद्धतीचे बंधारे असून ते जीर्ण झाल्यामुळे त्यांची दुरुस्ती करण्यास अडचणी येत असल्याने उक्त बंधाऱ्यांचे स्वयंचलित बॅरेजेसमध्ये रुपांतर करणे आवश्यक असणे तालुक्याच्या अनेक गावांतील शेती उजनीच्या बॅकवॉटरवर अवलंबून असणे, उन्हाळ्यात मोठ्या प्रमाणावर दुष्काळास सामोरे जावे लागणे, त्यामुळे या भागात बॅरेजेस बांधण्याची आवश्यकता असणे, पुणे महानगरपालिका हद्दीतील वितरण व्यवस्थेतील त्रुटींमुळे पाण्याचा अपव्यय होणे, पाण्याची गरज वाढत असल्याने कॉनोलवर शेतीला पाणी कमी मिळत असणे, मुळशीचे पाणी वळविण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीचा अहवाल प्रलंबित असणे, त्याचा फायदा शेतकऱ्यांना होणार असणे, जनाई शिरसाई व पुरंदर उपसा सिंचन योजनेच्या कामाला गती देऊन अवर्षणग्रस्त भागाला पाणी उपलब्ध करून देण्याची गरज असणे, याबाबत शासनाने करायची कार्यवाही व उपयोजना."

**(७) श्रीमती स्नेहा दुबे, सर्वश्री.राजेंद्र गावित, अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, नानाभाऊ पटोले, अमिन पटेल, विकास ठाकरे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"जि.पालघर, वसई-विरार उपप्रादेशिक ६९ गावांच्या ग्रा.पा.पुरवठा योजनांना २००८ मध्ये शासनाने सु.प्र.मा. देणे, योजना पूर्णत्वाचा कालावधी २४ महिन्यांचा असणे,

३/४ वेळा मुदतवाढ देऊन कोट्यवधी रुपयांचा खर्च करूनही, योजना पूर्णत्वास न जाणे, तदनंतर केंद्रशासन प्रणित जलजीवन मिशन योजना राज्यात राबविण्यास महाराष्ट्र शासनाने सन २०२० मध्ये मान्यता देणे, सन २०२४ पर्यंत राज्याच्या ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबास घरगुती नळजोडणीद्वारे मानशी प्रतिदिन किमान ५५ लिटर पाणी देण्याचे उद्दिष्ट असणे या योजनेअंतर्गत पालघर जिल्हयात जिल्हा परिषद व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्यामार्फत ५६२ योजनांची कामे हाती घेणे, या आराखड्याअंतर्गत एम.जी.पी. पालघर मार्फत एकूण २६ योजनांची कामे हाती घेणे, पालघर जिल्हयातील सर्व शासकीय विभागांची पाणी पुरवठा संबंधित कामे एकाच कंत्राटदाराला वेगवेगळ्या कंपन्याच्या नावाने मंजूर करणे, परिणामी अद्यापी ही कामे पूर्णत्वास न जाणे, वसई उपविभागातंर्गत १७ योजनांपैकी ६ योजना पूर्ण झाल्याचे कागदोपत्री दाखविणे, योजनेच्या एकूण खर्चापैकी जवळपास ९०% खर्चाची देयके मंजूर करणे, मात्र आजमितीस एकाही गावातील १००% घरांना पाणी सुरू न होणे. परिणामी, २००५ च्या योजनेंतर्गत झालेला कोट्यवधी रुपयांचा खर्च व तदनंतर सुधारीत योजनेवर पुन्हा खर्च करूनही या गावांतील नागरीकांना पिण्याच्या पाण्यापासून वंचित रहावे लागत असल्याने जनतेत पसरलेला असंतोष यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(८) डॉ. विनय कोरे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती केंद्र शासनाच्या शिक्षण मंत्रालयाच्या वतीने आणि छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्ती महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाच्या वतीने राबविली जात असणे, दोन्ही शिष्यवृत्ती शालेय स्तरावर इयत्ता नववी ते बारावी पर्यंत राबविण्यात येत असून सदर योजना फक्त राज्यातील सर्व शासकीय शासनमान्य अनुदानित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीच लागू असणे, सदर सर्व शिष्यवृत्ती या विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता स्कॉलरशिप असून त्या विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या मार्क्सवर अवलंबून असणे, परंतु सदर स्कॉलरशिप अकरावी किंवा बारावी मध्ये त्याने खाजगी विनाअनुदानित किंवा स्वयं अर्थसहाय्यीत शाळेत प्रवेश घेतल्यावर मिळत नसणे, त्यामुळे स्कॉलरशिपपासून वंचित विद्यार्थ्यांवर अन्याय होत असणे, राज्यातील कोणतीही शाळा अनुदानित किंवा विनाअनुदानित किंवा स्वयं अर्थसहाय्यीत असो ती शासनाच्या परवानगीने मान्यतेने सुरू असणे, तसेच शिष्यवृत्ती या विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर मिळत असल्याने शासन मान्यता प्राप्त अनुदानित किंवा विनाअनुदानित स्वयं अर्थसहाय्यित किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू करणे आवश्यक असणे, अशा प्रकारे शासनाने प्राधान्याने लक्ष घालण्याची गरज व मागण्यांबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(९) श्रीमती सीमा हिरे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राजुर बहुला नाशिक एमआयडीसीसाठी भूसंपादन प्रक्रिया चालू असून ३२(२) नोटीस १७ ते २३ डिसेंबर पासून लागू असून ३२(१) ची नोटीस दि. २५-१-२०२४ रोजी लागू झालेली असताना सदर ठिकाणी काही विकासक व एजंट यांनी शेतकऱ्यांकडून व जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी व एनओसी न घेता खरेदी विक्री व्यवहार केलेले सांगून भूसंपादन मोबदला त्यांच्या नावावर घेण्याचा प्रकार केलेला असणे, शासकीय अधिकारी कर्मचारी एमआयडीसी ऑफिसचे तात्कालीन प्रादेशिक अधिकारी दुय्यम निबंधक-५ कार्यालयातील निबंधक/उपजिल्हाधिकारी भूसंपादनक्र-२ नाशिक यांनी खरेदी घेणाऱ्यांबरोबर संगनमत करून स्वतःच्या नावावर एमआयडीसी कडून भूसंपादन मिळावा याकरिता बेकायदेशीर दस्त केले असणे, गट क्र. ६६ ६९ ७७/५७८/१/७९/१/बी ८१/१३,८१/३,८२/१ या जमिनीची खरेदी विक्री झालेली असून जमिनीचे तुकडेपाडणे वत्याचे एकत्रीकरण करणे,बाबत अधिनियम १९४७ दि. १-१-२०१६ शासन निर्णय शासन सुधारणेनुसार महाराष्ट्र धोरण जमीनचे तुकडे पाडण्यास प्रतिबंधक करण्याबाबतचा अधिनियम कलमांमध्ये ८ब नावाने समाविष्ट करण्यात आलेलाअसणे कलम ८ब नुसार नमूद केल्याप्रमाणे मंजूर केलेला पोट विभाग किंवा रेखांकन दस्त न जोडता दस्त स्वीकारता येणार नसणे, दुय्यम निबंधक-५ कार्यालयाने नोंदणी केली असून कार्यालयात मौजे राजूर बहुला ता.नाशिक येथील काही मिळकतीसाठी एकाच घरातील निरनिराळे व्यक्तींनी प्रमाणीभूत क्षेत्रापेक्षा कमी म्हणजे जिरायती क्षेत्र २० आर पेक्षा कमी करून नोंदणी केलेले असणे,दुय्यम निबंधक कार्यालयातील अधिकारी भूसंपादन अधिकारी यांनी संगनमत करून स्वतःचे नावे एमआयडीसी कडून भूसंपादन मोबदला मिळावा म्हणून सदर प्रकार करणे, त्यामुळे नाशिक एमआयडीसी मधील सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची आवश्यकता निर्माण झालेली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही."

**(१०) सर्वश्री. शांताराम मोरे, उमेश यावलकर, रईस शेख, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"वाडा- भिवंडी मनोर रस्त्याची अतिशय दुरवस्था झाल्याचे नुकतेच माहे मार्च, २०२५ मध्ये निदर्शनास येणे, या रस्त्यावर यापूर्वी अनेकदा मोठया प्रमाणात दुर्घटना घडून जीवतहानी झाल्या असणे, सदरहू रस्त्याकरिता शासनाने सुमारे ७७७ कोटी रुपयेचा निधी मंजूर केलेला असतांनाही, संबधित ठेकेदार रस्त्यांचे काम अत्यंत संथ गतिने करित असल्याने प्रचंड वाहतुककोंडी होत असणे, यासंदर्भात ठेकेदार व सबंधित अधिकारी यांना वेळोवेही सुचना देऊन त्यांच्याकडून जाणीवपूर्वक होत असलेली चालढकल, रस्त्याच्या संथगतीने चालू असलेल्या कामामुळे अत्यावश्यक सेवेमध्ये येत असलेला अडथळा, रस्त्याच्या कामासंदर्भात विचारणा केली असतांना ठेकेदारांकडून उडवाउडवीची मिळत असलेली उत्तरे, ठेकेदारांच्या मुजोरी, हलगर्जीपणामुळे रस्त्यांच्या कामास होत

असलेल्या विलंबाबाबत सखोल चौकशी करुन तातडीने रस्त्याचे काम युध्द पातळीवर करुन पावसाळयापूर्वी १ साईड लेन सुरु करण्याबाबतची कार्यवाही होण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, यास जबाबदार असणा-या ठेकेदार व संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

**(११) श्री. शिवाजी पाटील, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधतील:-**

"कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड, दुंडगे, माणगाव, हेरे, कानडी इनामसावर्डे हल्लारवाडी, भंडूरा, गडहिंग्लज, निलजी, जरळी, आजरा तालुक्यातील-सरोळी-आयनापुर, हरूर-गजरगाव तसेच नेसरी-डोनेवाडी यांना जोडणारा पूल ५० वर्षांपासून प्रलंबित असणे, चंदगड तालुक्यातील पारगडकडे जाणारा रस्ता करणे गरजेचे असणे, सिंधुदुर्ग मार्गे गोवा राज्याकडे जात असल्याने यावरुन वाहतूक मोठ्या प्रमाणत होणार असणे, सदरचा रस्ता झाल्याने तेथील नागरिकांना दळणवळण करणे खूप उपयुक्त होणार असणे, चंदगड ता. १६ धनगरवाडे असून त्या धनगरवाड्यांना जोडणारे रस्ते नसणे, पक्के रस्ते नसल्याने आजही या धनगरवाड्यातील नागरिकांना रुग्णांना घेऊन ५ ते ७ किलोमीटर पायपीट करावी लागणे, अशा परिस्थितीत तो रुग्णजगेल याची शाश्वती नसते एवढी बिकट अवस्था या भागात असणे, चंदगड,ता.कोलिकहे गाव कर्नाटक सीमेलगत असून या गावापासून चंदगड शहराचे अंतर ६० कि.मी.असणे, या गावाला जोडणारा रस्ता ७० वर्षांपासून झालेला नसणे, तसेच गडहिंग्लज तालुक्यातील निलजी ते सीमावर्ती भागापर्यंत रस्ता होणे आवश्यक असणे, १)वेंगुर्ला-आंबेवाडी-नागणवाडी बेळगाव हा रस्ता रा.मा.१८० चा असून चंदगड तालुक्यातील लांबी हि ४३.२० कि.मी.आहे. सदर रस्त्यावर वाहतूक वाढली असल्याने रस्त्याचे रुंदीकरण करणे आवश्यक आहे.२) रा.मा.१८९ ते घोडगेवाडी-मिरवेल-पारगड-नामखोल-तेरवण-वाघोत्रे ते रा.मा.१८९ ला जोडणारा राज्य मार्ग १८७-सदर रस्त्याची एकूण लांबी ही ३८/४०० कि.मी. इतकी असणे, गोवा - कोकण ला जोडणारे आंबोली घाटवतिलारी घाट नादुरुस्त असल्याने अवघड वाहतुकीस प्रतिबाधित असून सदर रस्ता रुंदीकरण होण्याची आवश्यकता असणे, ३) रा.मा.क्र.१८७ ते रामघाट इसापूर ते कोल्हापूर जिल्हा हद्द रस्ता प्रजिमा-७५ या सदर रस्त्याची लांबी ही ५.०० कि.मी.इतकी असून सदर रस्ता रुंदीकरण व नूतनीकरण करण्याची आवशक्यता, प्रजिमा ६५ ते नागरदळे-करेकुंडी-सुंडी-महिपाळगड-शिनोळी-तुडये रस्ता प्रजिमा ६८ या रस्त्याची लांबी ही २९/१०० कि.मी. सदर रस्ता रुंदीकरण व नूतनीकरण करणे महत्वाचे असणे, ५)कोल्हापूरगारगोटी-गडहिंग्लज-चंदगड-मोटणवाडी-भेडशीरस्ता राज्यमार्ग १८९ कि.मी. १३५/२४०-कि.मी.१३५/२४०सदर पूल १ महिने पाण्याखाली असणे, ६) कोल्हापूर पारितगारगोटी-गडहिंग्लज-चंदगड-मोटणवाडी-भेडशी रस्ता राज्यमार्ग १८९ कि.मी. ९०/४८० मध्ये पूल बांधणे, कि.मी.९०/४८०वर अस्तित्वातील पूल हे सबमर्सिबल प्रकारचे

असणे, सदर पूल पावसात वारंवार वाहतुकीस बंद असून तो सुरु करण्यात यावा अशी मागणी होणे. चंदगड, गडहिंग्लज, आजरा तालुक्यांचा भाग हा डोंगराळ असून यातील काही भागात पावसाचे प्रमाण जास्त असणे, येथील गावांचा संपर्क तुटतो यास्तव येथील पुलांची उंची वाढवणे गरजेचे आहे, या ठिकाणी पक्के रस्ते, पूल होणे गरजेचे असल्याने शासनाने यावर करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(१२) सर्वश्री. विजय वडेट्टीवार, अस्लम शेख, संजय मेश्राम, सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे ग्रामविकास व पंचायत राज मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"चंद्रपूर जिल्यातील वरोरा तालुक्यातील अरविंदो रिऑलिटी ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.कंपनी व्यवस्थापनाने शासनाची कोणतीही मंजूर न घेता नियमबाहय मौजा किलोरा-बेलोरा -जेमा इजिमा रस्ता १६ या रस्त्याचे खोदकाम करणे, रस्त्याच्या खोदकामामुळे बेलोरा,टाकळी, जेमा, पानवडाळा, कानसा, किलोनी या परिसरातील शेकडो लोकांचा जाणा-येणाचा मार्ग बंद करणे, गावकऱ्यांच्या विरोध असतांना सुध्दा रस्त्याचे खोदकाम करणे, बेलोरा,टाकळी, जेमा, पानवडाळा, कानसा, किलोनी या गावाचे पुनर्वसन अघापही करण्यात आले नसतांनाही कंपनी व्यवस्थापनाने कायदा हातात घेऊन परिसरातील नागरिकांना वेठीस धरून त्यांना मानसिक व आर्थीक त्रास देणे, ग्रामसभेचा ठराव असून सुध्दा या ठरावाच्या विरोधात जाऊन कंपनीने नियमबाहय काम करणे, याबाबत नागरिकांनी ग्रामसभेच्या ठरावासह लेखी तक्रार चंद्रपूरचे जिल्हाधिकारी, जिल्हा पोलिस अधिक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम, यांना करून सुध्दा याबाबत अद्यापही कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नसणे, कंपनीने बेकायदेशीर रस्ता खोदून नागरिकांचा रस्ता बंद करणाऱ्या कंपनी व्यवस्थापना विरोधात तातडीने फौजदारी कारवाई करण्याची मागणी परिसरातील शेकडो नागरिकांनी करून सुध्दा अघापही कारवाई होत नसल्यामुळे नागरिकांत पसरत असलेले तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण, परिणामी याबाबत तातडीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१३) श्री.समीर मेघे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे ग्रामविकास व पंचायत राज मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"बोखारा ग्रामपंचायतच्या (ता.जि.नागपूर) बनावट पावत्यांद्वारे १४ ते १५ कोटींची कर वसुली केल्याचा धक्कादायक प्रकार फेब्रुवारी २०२५ मध्ये वा त्या सुमारास उघडकीस आला असणे, या बनावट पावत्या कर व फी वसुलीच्या असणे, यात एक हजार को-या पावत्या आढळणे, या बुक व पावत्यांची बीडीओंकडे कोणतीही नोंद नसणे, या प्रकरणी ग्रामपंचायत कर्मचा-यांच्या मोबाईल फोनमध्ये काही कॉल रेकॉर्ड क्लिप आढळून येणे, ज्या कर्मचा-याच्या कपाटात ग्रामविकास अधिकारी यांना या बनावट पावत्या बुक आढळून

आल्या होत्या त्याच्याच फोनमध्ये या क्लिप आढळून येणे, बोखारा येथील एक लोकप्रतिनिधी व ग्रामपंचायत कर्मचारी यांच्यातील संभाषणाच्या या सर्व क्लिप मालमत्ता व पाणी कराच्या रकमेच सेटलमेंट करण्याबाबतच्या असणे, उक्त प्रकरण अतिशय गंभीर असून याची सीयाडीमार्फत चौकशी करण्याची आवश्यकता असणे, सदरहू प्रकरणी तात्काळ चौकशी करून संबंधित दोषींविरुद्ध कडक कारवाई करण्याची गरज, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१४) श्री. हेमंत ओगले, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे ग्रामविकास व पंचायत राज मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये ६० हजारहून अधिक कर्मचारी सफाई कामगार, पाणीपुरवठा कामगार, वीजपुरवठा कामगार, करवसुली लिपिक इत्यादी विविध पदांवर कार्यरत असणे, या कर्मचाऱ्यांची नगरपालिका कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनश्रेणी मिळणेबाबत तसेच ग्रामपंचायत वसुलीच्या प्रमाणात वेतन मिळण्याची अट रद्द होणेबाबत शासनासोबत सातत्याने पत्रव्यवहार करीत असणे, याबाबत शासनाकडून स्थापित विविध समित्यांनी नगरपालिका कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनश्रेणी लागू करणेबाबत शासनाकडे अहवाल सादर केलेला असणे, परंतु शासनाकडून होत असलेले दुर्लक्ष, परिणामी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या मनात निर्माण होत असलेली नाराजी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१५) सर्वश्री. चरणसिंग ठाकूर, मोहन मते, विजय वडेट्टीवार, योगेश सागर, संजय मेश्राम, सुधीर मुनगंटीवार, अस्लम शेख, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"काटोल (जि.नागपूर) कोतवालबर्डी शिवारातील एशियन फायर वर्क्स या फटाके निर्मिती करणा-या कंपनीत दि.१६ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास भिषण स्फोट होणे, सदर स्फोटात दोन कामगांचा घटनास्थळी जागीच मृत्यू होणे, तसेच चार कामगार गंभीर जखमी होणे, स्फोटाची कारणे काय आहेत हे अद्यापही स्पष्ट न होणे, तसेच सदर अपघातात मृत पावलेल्या कामगारांच्या कुटुंबियांना तसेच जखमींना अद्यापही कोणतीच आर्थिक मदत देण्यात न येणे, त्यामुळे मृत कामगारांच्या कुटुंबियांच्या व जखमी कामगारामध्ये वाढते भितीचे व तीव्र असंतोषाचे वातावरण, शासनाने उक्त घटनेची तातडीने पारदर्शक चौकशी करण्याची आवश्यकता, तसेच मृत कामगारांच्या कुटुंबियांना तसेच जखमींना तात्काळ आर्थिक मदत देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."

## (सकाळी ११.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**(१) मुख्यमंत्री :**

**(क)** महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचा सन २०२१-२०२२ चा वार्षिक अहवाल व सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक लेखा अहवाल आणि त्यावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा अलग लेखापरीक्षा अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा एकोणीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(२) दुग्धविकास मंत्री :**

महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्यादित मुंबई (महानंद) यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वैधानिक लेखा परिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(३) ग्रामविकास व पंचायत राज मंत्री :**

**(क)** सन २०२०-२०२१ चा महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यावरील पन्नासावा लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** सन २०२१-२०२२ व २०२२-२०२३ चे ठाणे/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग/ पालघर/ नाशिक/ धुळे/ नंदुरबार/ जळगांव/ अहिल्यानगर/ पुणे/ सातारा/ सांगली/ सोलापूर/ कोल्हापूर/ छत्रपती संभाजीनगर/ जालना/ परभणी/ हिंगोली/ बीड/ नांदेड/ उस्मानाबाद/ लातूर/ अमरावती/ अकोला/ वाशिम/ बुलढाणा/ यवतमाळ/ नागपूर/ वर्धा/ भंडारा/ गोंदिया/ चंद्रपूर व गडचिरोली या ३४ जिल्हा परिषदांचे वार्षिक प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

**(गुरुवार, दिनांक २० मार्च, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक १ व २)**

**(१) डॉ. बाबासाहेब देशमुख, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वने मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"सांगोला, पंढरपूर, मंगळवेढा या तालुक्यासह सोलापूर जिल्ह्यातील सामाजिक वनीकरण विभागाच्या वृक्ष लागवड योजनेमध्ये संबंधित विभागाच्या तत्कालिन अधिकारी व इतर ७ अधिकारी यांनी १०९ कोटी रूपयांचा अपहार केल्याचे उघडकीस येणे, राज्य शासनाच्या वन विभागाने सुमारे ३३ कोटी वृक्ष लागवडीचे उद्दीष्ट डोळयासमोर ठेऊन प्रत्येक जिल्ह्यातील वन विभागाअंतर्गत सामाजिक वनीकरण योजनेंतर्गत वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घेण्यात येणे, परंतु सांगोला, पंढरपूर, मंगळवेढा तालुक्यात प्रत्यक्षात वृक्ष लागवड न करता, रोपवाटीका न जगवता, रस्ता दुतर्फा वृक्ष लागवड न करता, खते व पाणी न देता, त्याचे संगोपन न करता खाजगी वन संरक्षक व इतरांच्या नावे बोगस बिले काढून तत्कालीन वन अधिकारी व इतर ७ जणांनी बनावट, बोगस अहवाल, प्रतिज्ञापत्र व इतर कागदपत्रे तयार करून शासनाची दिशाभूल करून करोडो रूपयांची संगनमताने शासनाची फसवणूक करण्यात येणे, शासनाची फसवणूक करण्यात येणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर शासनाकडून कोणतीही कारवाई अद्याप करण्यात न येणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना "

**(२) सर्वश्री. संजय केळकर, किसन कथोरे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वने मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"संजय गांधी राष्ट्रीय उदयान, बोरीवलीचे राखीव वनक्षेत्रातील, पाचपाखाडी भागात, वनखंड क्रमांक ११४४ मध्ये, हजरत पीर मामू भांजे दर्गा ट्रस्ट ने अवैधरीत्या अतिक्रमण केलेले असणे. सदरहू अतिक्रमणाबाबत वन अधिकारी, परिमंडळ येऊर यांनी वन गुन्हा दाखल केलेला असणे, तसेच प्राधिकृत अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (उत्तर) येऊर, ठाणे यांनी दि.०७.०७.२०२३ रोजी प्रस्तूत दर्गाच्या अतिक्रमणाबाबत रितसर चौकशी करुन सदर अतिक्रमण ०८ दिवसांच्या आत काढून टाकणेबाबत आदेश पारित केलेले असणे, परंतू आज पर्यंत सदर अतिक्रमण ट्रस्टने स्वत:हून काढलेले नसणे, तसेच वन विभागाचे अधिकारी यांनी देखील अतिक्रमण निष्कासीत करण्याची कार्यवाही केलेली नसणे, तसेच सदर अतिक्रमण झालेले असल्याबाबत सकल हिंदू समाज तसेच विविध राजकीय संघटना यांनी वेळोवेळी निवेदने देऊनही आजपर्यंत ठोस कार्यवाही झालेली नसणे. सदर अतिक्रमणामुळे वन कायद्यांचे गंभीर उल्लंघन होणे, वनजमीन तसेच शासकीय जमिनींवर झालेल्या धार्मिक अतिक्रमणांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा तसेच राष्ट्रीय सुरक्षेचा प्रश्न निर्माण होण्याची

अप्रकाशित

शक्यता असणे व याबाबत भारतीय वायुसेना तळ (कान्हेरी हिल) यांनी चिंता व्यक्त करुन, जिल्हाधिकारी ठाणे व पोलीस उपआयुक्त (झोन-5) यांना सदर अतिक्रमणांवर नियमानूसार तात्काळ कार्यवाही करण्याबाबत पत्र दिलेले असणे, त्याअनुषंगाने सदरहू अवैध धार्मिक अतिक्रमणांबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) श्री. दिलीप लांडे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईतील चांदिवली विधानसभा या क्षेत्रात मोठया प्रमाणात बेकायदेशीरपणे गुटका, गांजा, चरस, अशा अंमली पदार्थांची विक्री तसेच ऑनलाईन लॉटरी राजरोसपणे सुरु असणे, सदरहू भाग बहुतांशी झोपडपटटी बहुल विभाग असून दाटीवाटीने वसलेल्या भागात अंमली पदार्थ प्रतिबंधक कायदयानुसार कुठलाही मादक पदार्थ बाळगणे गुन्हा असतांना तसेच या भागात साकीनाका पोलिस ठाणे आणि घाटकोपर पोलीस ठाणे येत असतांनाही मोठया प्रमाणात अवैध अंमली पदार्थाची विक्री होत असणे, गांधीनगर, काजुपाडा येथील तय्यब सुपारीवाला हया दुकानाचा मालक फहिम खान हा शाळेतील मुलांच्या माध्यमातून खुलेआम /अवैध गुटका विक्री करीत असणे, सदर भागात बेकायदेशीरपणे सुरु असणा-या गुटखा, गांजा, मटका आदी व्यवसायामुळे स्थानिक महिलांना बाहेर फिरणे मुश्कील होणे, याबाबत स्थानिक पोलिसांकडून चरस, गांजा, गुटखा विक्री करणा-यांना पाठिशी घालण्यात येत असल्याने अंमली पदार्थ विक्रीत वाढ होत असणे, त्याचबरोबर साकीनाका-घाटकोपर विभागात मोठया प्रमाणात ऑनलाईन लॉटरी व अंमली पदार्थांची विक्री सर्रास सुरु असून त्यावर कठोर कारवाई होणे गरजेचे असतानाही त्याकडे हद्दीतील पोलिस ठाण्याकडून होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे तरुण पिढी व्यसनाधीन होणे, याबाबत शासनाने तात्काळ लक्ष घालून तरुण पिढी व्यसनाधीन होण्यापासून वाचविण्याकरिता अंमली पदार्थांची विक्री करणा-या व्यवसायिकांवर अंमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यांतर्गत कठोर कारवाई करण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(४) श्री. सुभाष देशमुख, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"सोलापूर जिल्ह्यात एमआयडीसी नई जिंदगी भागात विमान तळाशेजारी आणि कणबस ता.दक्षिण सोलापूर येथे अवैध मार्गाने बांगलादेशी वास्तव्य करत असल्याची बाब सोलापूर पोलिसांच्या निदर्शनास आल्याने सोलापूर एमआयडीसी पोलीस कर्मचाऱ्यांनी त्यांना ताब्यात घेतलेले असणे,एमआयडीसी रोड सोलापूर या भागात हे बांगलादेशी नागरिक बेकायदेशीररित्या राहत असल्याचे निदर्शनास येणे, त्यांच्यावर शासनाने कडक कारवाई करण्याची मागणी शहरवासीयांमधून होत असणे, या बांगलादेशी नागरिकांनी देशांमध्ये कोणत्याही प्रकारच्या वैध प्रवासी परवानगी व

कागदपत्राशिवाय तसेच भारत बांगलादेश सीमेवरील मुलकी नोंदणी अधिकारी यांचे लेखी परवानगीशिवाय अवैध मार्गाने घुसखोरी करून भारत देशात प्रवेश करून बनावट भारतीय आधार कार्ड बनऊन सोबत बाळगत असल्याने भारतीय नागरिकांना परदेशी नागरिकांपासून धोका निर्माण झालेला असणे, त्यासाठी राज्य शासनाने तात्काळ याची दखल घेऊन राज्यात घुसखोरी करून घुसलेल्या बांगलादेशी नागरिकांना तात्काळ त्यांच्या मूळ देशात पाठवण्याची आवश्यकता निर्माण झालेली असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपायोजना."

**(५) श्री. महेश लांडगे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"दि.२८ फेब्रुवारी २०२५ रोजी वा त्यासुमारास गाव-साखर, ता.राजगड (वेल्हा) जि.पुणे येथे एका अश्फाक शेख नावाच्या मुलाने त्यांच्या इंस्टाग्राम अकाउंट वरील स्टोरी मध्ये औरंगजेबचे फोटो स्टेटस ठेऊन उदात्तीकरण केलेले असणे, सदर कृत्यामुळे संपूर्ण राजगड (वेल्हा) तालुक्यात हिंदुत्ववादी संघटना व स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये संतापाची लाट उसळणे,औरंगजेबाचे स्टेटस ठेवणाऱ्या आरोपी व त्याच्या पालकांवर गुन्हा दाखल करावा असे निवेदन सकल हिंदू समाज तसेच भाजपा युवा मोर्चा व गुंजन मावळ दुर्ग रक्षक संघ यांनी वेल्हा पोलीस स्टेशनमध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन खामगळ यांना दि.०२ मार्च २०२५ रोजी दिलेले असणे, मात्र अद्याप गुन्हा रजिस्टर न होणे, संबंधित प्रकरणात आवाज उठवणाऱ्या शिवभक्तांवर भारतीय न्यायसंहितेच्या कलम १०९ प्रमाणे जिवे मारण्याचा प्रयत्न करणे यासारखे खोटे गुन्हे दाखल केले गेलेले निदर्शनास येणे,याबाबत संबंधित पोलिस स्टेशनच्या पोलिस निरीक्षकांनी चुकीच्या पद्धतीने हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांना वागणूक दिल्याचे निदर्शनास येणे, या सर्व प्रकरणाचे सोशल मीडियामध्ये फोटो व्हायरल होणे, यामुळे सरकारची प्रतिमा मलीन होणे सामाजात तेड निर्माण होऊन असंतोष पसरणे, यामुळे संबंधित प्रकरणाबाबत हिंदुत्ववादी संघटनेने तीव्र आंदोलन करणे,मात्र आरोपी अश्फाक शेख याच्यावर गुन्हा दाखल न होणे आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन खामगळ यांच्यावर अद्याप कारवाई न होणे, सदर गंभीर प्रकरणाची चौकशी करून शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(६) सर्वश्री. प्रशांत ठाकूर, समीर कुणावार, महेश बालदी, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. अमित साटम, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"पनवेल महानगरपालिका हद्दीत सिडकोच्या कॉर्पोरेट पार्क सेक्टर येथील मोकळ्या भूखंडावर दि. ३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२५ रोजी वा त्यासुमारास मुस्लिम धर्मीयांच्या इज्तिमाचे अनधिकृतरित्या आयोजन होणे, सिडकोची परवानगी पनवेल महानगरपालिकेच्या परवानगीच्या अधीन असणे, परंतु सदर आयोजनास

महानगरपालिकेची परवानगी नसणे, सिडकोने परवानगी देताना ध्वनी प्रदूषण, कायदा सुव्यवस्था, रहदारी व अन्य संबंधी घालून दिलेल्या अटी शर्तीचे पालन न होणे, सदर आयोजन करण्यापूर्वी पोलीस व वाहतूक विभागाचे ना-हरकत दाखला घेतला नसणे, सदर इज्तिमामध्ये भडकावू भाषणे होणे, इज्तिमाच्या उक्त दिवशी सायंकाळी परतत असताना मोहम्मद रेहान अन्सारी व अन्य एका इसमाने शिवकुमार शर्मा या युवकाला धार्मिक द्वेशातून जबर मारहाण करणे, या मारहाणीत सदर युवकाच्या डोक्याला गंभीर दुखापत होणे, युवक शिवकुमार शर्मा तक्रार दाखल करण्यासाठी खारघर पोलीस स्टेशनमध्ये जाणे, जखमी अवस्थेत पोलिस स्टेशनला असताना देखील पोलिसांनी योग्यरितीने तक्रार दाखल न करणे तसेच श्री.शर्मा यांना तात्काळ उपचारासाठी न नेणे, परिणामी श्री. शिवकुमार शर्मा यांचा मृत्यू होणे, बराच कालावधी होऊनही आयोजकांवर गुन्हा दाखल न होणे, सदर गंभीर घटनेनंतरही आजतागायत इज्तिमा आयोजकांवर कोणतीही फौजदारी अथवा अन्य कारवाई न होणे, सदर बाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(७) श्री. मुरजी पटेल, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईमधील अंधेरी पूर्व येथे मुंबईतील एकमेव औद्योगिक क्षेत्र असून या ठिकाणी छोटे मोठे अनेक उद्योग असणे, या औद्योगिक क्षेत्रात राज्यातून, देशातील विविध ठिकाणावरून येणाऱ्यांची नागरिकांची संख्या मोठी असून रोज सहा लाखाहून अधिक नागरीक, चाकरमानी या ठिकाणी येत असणे, तसेच येथे येणाऱ्या वाहनांचीही संख्या मोठ्या प्रमाणात असणे, अंधेरी पूर्व विधानसभा क्षेत्रातील १२ पेक्षा अधिक विकास नियोजन रोड (डीपी रोड) रस्ते खुले नसणे, त्यामुळे याठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतुकीची कोंडी निर्माण होत असून वाहतुकीची गंभीर समस्या असणे, वाहतुकीच्या कोंडीमुळे आणीबाणीतील रुग्ण वेळेत रुग्णालयाच्या पोहचू शकत नसणे, परिणामी उपचारा अभावी रुग्णाला प्राणास मुकावे लागत असणे, येथील निर्माण झालेली वाहतुकीची गंभीर समस्या सोडविण्यासाठी प्रस्तावित बंद असलेले विकास नियोजन (डी पी रोड) रस्ते तातडीने खुले करून सदरहु रस्त्यात बाधित होणाऱ्या कुटुंबाचे पुनर्वसन अंधेरी पूर्व परिसरातच करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(८) श्री.राजन नाईक, ॲड.पराग अळवणी, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"वसई- विरार महापालिका क्षेत्रातील नालासोपारा पूर्व येथील मौजे आचोळे, सर्व्हे क्र. २२ ते ३२ आणि ८३ हे वसई विरार महानगरपालिकेने विकास आराखडयाखालील एस.टी.पी. आणि डंपिंग ग्राऊंडसाठी आरक्षित करण्यात येणे, व.वि.श. मनपा क्षेत्रात विकासकामांसाठी आरक्षित अशा अनेक भुखंडांवर भुमाफियांनी अवैध निर्माण करून

विकासकामांना अडथळा निर्माण केल्याचे मा. उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आल्याने एस.टी.पी. आणि डंपिंग ग्राऊंडसाठी आरक्षित असलेल्या भूखंडावर झालेले ४१ अनधिकृत निर्माण तात्काळ निष्कासित करण्याचे आदेश मा. न्यायालयामार्फत देण्यात आल्याची बाब निदर्शनास येणे, या अनुषंगाने व.वि.श. महानगरपालिके मार्फत नोव्हेंबर २०२४ दरम्यान, त्याचप्रमाणे फेब्रुवारी २०२५ दरम्यान सदरहू अनधिकृत इमारतींवर तोडक कारवाई करण्यात आली असणे, या ४१ इमारतींच्या निष्कासनामुळे जवळपास २५०० कुटुंबे बेघर होण्याची बाब समोर येणे, सदर इमारती उभारलेली जागा आरक्षित असल्याची माहिती असतानाही विकासक यांनी तत्कालीन नगरपालिका व महापालिका अधिका-यांच्या संगनमताने या नगरिकांची फसवणूक केली असल्याची बाब निदर्शनास येणे, तोडकामाच्या कारवाईमुळे बाधित होणा-या रहिवाशांचे पुनर्वसन करता येईल का, याची व्यवहार्यता तपासून त्याविषयीच्या शक्यतांचा सरकारी प्रशासकांनी विचार करावा अशी सूचना मा. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या आदेशात केल्याची बाब निदर्शनास आली असणे, सदरहू बाधित रहिवाश्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून त्यांचे योग्य ते पुनर्वसन करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(९) डॉ. राहूल पाटील, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"नगरविकास विभागाच्या अमृत २ अभियान या योजने अंतर्गत १) परभणी शहरातील येलदरी समांतर पाणी पुरवठा करण्याची योजना २) परभणी शहर भुयारी गटार मलनिस:रण योजना ३) परभणी महानगरपालिका क्षेत्रात नवीन नाट्यगृह बांधण्याची योजना असे एकूण तीन प्रस्ताव जुलै, २०२२ ते जानेवारी, २०२३ या दरम्यान राज्यस्तरीय उच्चाधिकार समितीने मान्यता दिल्यानंतर नगरविकास विभागाकडे प्रशासकीय मन्यातेसाठी सादर करण्यात येणे, तथापि अद्यापपर्यंत सदर तिन्ही प्रस्ताव नगरविकास विभागाकडे प्रलंबित असणे, परभणी क्षेत्रातील नागरिकांना पाणी पुरवठा, भुयारी गटार योजना व नाट्यगृहाचा लाभ देण्यासाठी उपरोक्त तिन्ही प्रस्तावांना नगरविकास विभागाने मान्यता देण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार शासनाकडे केलेली असणे, परंतु अद्यापही कोणतीच निर्णयात्मक कार्यवाही न होणे, परिणामी नागरीकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची भूमिका."

**(१०) श्री. संजय उपाध्याय, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई शहर व उपनगरात शासकीय जमीनींवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे करुन अनाधिकृत बांधकामे व अनाधिकृत धार्मिक स्थळांचे बांधकाम झालेले असणे, सदरच्या अनाधिकृत आतिक्रमणे व बांधकामाबाबत अनेक तक्रारी प्राप्त असणे, याबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नसणे, यामुळे शासकीय जमीनींवर यामध्ये प्रामुख्याने

घाटकोपर मानखुर्द लिंक रोड येथील म्हाडा कॉलनीजवळ म्हाडाच्या जागेवर नूर-ए-इलाही या मस्जिदीचे अनाधिकृत बांधकाम,मालवणी येथील न्यू कलेक्टर कंपाऊंड गेट क्र.५ मालाड पश्चिम येथील नगर भूमापन क्र.१८४१ वरील अनाधिकृत बांधकाम, कोळीवाडा येथील वॉर्ड नं. २२४ ब वॉर्ड मधील अनाधिकृत धार्मिक स्थळाचे बांधकाम,वाशी नाका चेंबूर येथे म्हाडाच्या जमीनीवर करण्यात आलेली अनाधिकृत बांधकामे,साईबाबा नगर धारावी येथे करण्यात आलेल्या अनधिकृत धार्मिक स्थळाचे बांधकाम,चेंबूर येथील संगम को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी जागेवर अतिक्रमण करुन करण्यात आलेले अनाधिकृत बांधकाम यांचा समावेश असणे, यासह १५ पेक्षा अधिक ठिकाणी शासकीय जागांवर अतिक्रमण करुन अनाधिकृत धार्मिक स्थळांचे बांधकाम झालेले असणे, सदर अनधिकृत धार्मिक स्थळांचे बांधकाम करण्यापूर्वी कायदेशीर बाबींची पूर्तता केलेली नसणे, सदर अतिक्रमणांचे, अनाधिकृत बांधकामांचे निष्कासन न झाल्याची स्थानिकांची तक्रार असणे, सदरचे अतिक्रमणाबाबत डोळेझाक व कारवाई करण्यास टाळाटाळ करणाऱ्या संबंधित प्रशासकीय अधिकारी यांच्यावर कारवाई व सदर सर्व अतिक्रमणे निष्कासित करून शासकीय जागा शासनाने ताब्यात घेण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(११) श्री. योगेश सागर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईतील चारकोप येथील सेक्टर १ मध्ये प्लॉट नं. १४५ वर नशेमन सहकारी गृहनिर्माण संस्था ही म्हाडाची निवासी वास्तू अस्तित्वात असणे, या वास्तूतील रूम क्र. १४ ते १६ मध्ये त्या रुमच्या मालकांनी अनधिकृतरित्या मशिद सुरु केली असल्याचे निदर्शनास येणे, या रुमच्या मालकांनी संस्थेकडून, महानगरपालिकेकडून अथवा म्हाडाकडून कोणतीही रितसर परवानगी घेतली नसल्याचे निदर्शनास येणे, सद्यःस्थितीत या वास्तूत ३० पैकी २७ रुममध्ये हिंदू कुटुंबे राहत असल्याचे निदर्शनास येणे, मशिदीमुळे मुस्लिम समाजाच्या व्यक्तींची या वास्तूत सातत्याने वर्दळ असल्याचे व परिणामी त्या वास्तूत राहणा-या सर्व सामान्यांना त्रास होत असल्याच्या तक्रारी संबंधितांनी मुंबई महानगरपालिका, स्थानिक पोलीस, म्हाडा व लोकप्रितनिधींकडे केल्या असल्याचे आढळून येणे, ही बाब गंभीर असून या परिसरात नाहक जातीय तेढ निर्माण होण्याची शक्यता असणे, या बाबीची तातडीने चौकशी करुन कारवाई होण्याची व त्या वास्तूतून मशीद तात्काळ हटविण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१२) सर्वश्री. अतुल भातखळकर, अस्लम शेख, नानाभाऊ पटोले, अमिन पटेल, विजय वडेट्टीवार, डॉ. विश्वजित कदम, श्री. संजय मेश्राम, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"कोस्टल रेग्युलेशन झोन (सीआरझेड) आणि नो डेव्हलपमेंट झोन (एनडीझेड) जमिनींना विकसित करण्यायोग्य बनवण्यासाठी मालमत्तेच्या नोंदींमध्ये मोठ्या प्रमाणावर फेरफार केल्याचा जमीन घोटाळा माहे जानेवारी २०२५ मध्ये निदर्शनास येणे, त्यामध्ये, मालाडच्या एरंगळ, मढ आयलंड, वर्सोवा आणि इतर पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील ठिकाणांवर सरकारी नोंदी बदलून सुमारे १०२ नकाशे बदलण्यात आले असणे, त्यामध्ये न्यायालयाने या प्रकरणात विशेष पथक स्थापन करून तपास करण्याचे आदेश दिल्याचे निदर्शनास येणे, तसेच हा घोटाळा मुख्यतः दलाल, सरकारी कर्मचारी आणि कंत्राटदारांच्या संगनमताने घडल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची गरज असणे, तसेच चौकशीत दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(१३) श्री.राजु तोडसाम, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"अमरावती विद्यापीठाद्वारे २०२४ च्या एलएलएम हिवाळी परीक्षेचा निकाल मागच्या आठवड्यात निर्गमित करण्यात आलेला असणे, तेव्हा ज्या विद्यार्थ्यांनी मराठी भाषेत पेपर सोडविले होते त्यांच्या गुणपत्रिकेवर शून्य असे मार्क्स असलेली मार्कशीट जारी करण्यात येणे, जेव्हा अश्या शून्य मार्क्स प्राप्त विद्यार्थ्यांनी लेखी स्वरूपात व काही सिनेट सदस्यांसोबत चर्चा केली तर मराठी भाषेत एलएलएम चे पेपर्स मूल्यांकनची मुभा अथवा कायदा अमरावती विद्यापीठात नसल्याचे कळविण्यात येणे, तसेच पीडित विद्यार्थ्यांनी लेखी स्वरूपात याबाबत जो न्याय मागितला होता, याबाबत अद्यापही कुठलीही कार्यवाही करण्यात आलेली नसणे, असे २५ पेक्षा अधिक पीडित विद्यार्थी असणे, २५ % पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना सर्व विषयात शून्य मार्क्स असल्याची गुणपत्रिका बहाल करण्यात आली आसणे, एकीकडे केंद्र सरकारने राज्यातील मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देऊन मराठी भाषेचा सन्मान केरणे, तसेच महाराष्ट्र सरकारने सुद्धा असे परिपत्रक निर्गमित केले की जिल्हा न्यायालय व जिल्हा कचेरीत मराठी भाषेचा अधिकाधिक वापर दैनंदिन कामकाज व व्यावहारात करावा, तेव्हा अमरावती विद्यापीठाने एलएलएम परीक्षेचे मूल्यांकन न करुन मराठी भाषेचा अवमान करत असल्याचे निदर्शनास येणे, ज्या विद्यार्थ्यांनी एलएलएम परीक्षा मराठी भाषेत दिली असेल अश्या सर्व विद्यार्थ्यांच्या पेपर्स चे मूल्यांकन करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१४) श्री. सुहास बाबर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वने मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"सांगली जिल्ह्यातील खानापूर, आटपाडी तालुक्यातील बरीचशी कामे वन विभागाकडून अडविली जात असणे, मौजे. मेंगाणवाडी ता. खानापूर येथील जलजीवन मिशन अंतर्गत पिण्याच्या पाण्याच्या टाकीचे काम मागील ०२ वर्षांपासून वनविभागाकडून अडविण्यात येणे, पोसेवाडी, ऐनवाडी, मेंगाणवाडी, किंदरवाडी, विजयनगर इ. गावे वर्षानुवर्षे वनविभागात असल्याने गावांत विकास कामे करता न येणे, सदर गावातील नागरिकांना घरे निष्काषित करण्याच्या नोटीसा देण्यात येणे, तालुक्यातील टेंभू योजनेची कामे वन विभागामुळे थांबलेली असणे, मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत किंदरवाडी-अडसरवाडी मंजूर रस्त्याचे काम वनविभागाकडून अडविण्यात येणे, सदर कामाचे प्रस्ताव वनविभागाकडून अडविण्यात येणे, शेटफळे ता.आटपाडी, येथे महावितरण कंपनीचे सबस्टेशनचे काम पूर्ण होऊनही पाचेगांव ता.सांगोला वन विभागाच्या हद्दीमध्ये ३ पोलचे काम थांबल्याने आटपाडी तालुक्यातील १० गावातील शेतकऱ्यांना वीज न मिळणे, आटपाडी तालुक्यात वनविभागाच्या कामांना जिल्हा नियोजन समितीतून दि. १४ मार्च २०२४ ला प्रशासकीय मान्यता देणे, दुसया दिवशी त्या कामाचे दि. १५ मार्च ला कार्यारंभ आदेश देणे, बोगस मजूर दाखवणे, याबाबत जिल्हा नियोजन समिती सभेमध्ये तक्रार होणे, यामध्ये लाखो रुपयांचा भ्रष्टाचार होणे, यासंदर्भात लोकप्रतिनिधींनी वन विभागाकडे पाठपुरावा करुन अद्यापही कोणतीच कार्यवाही न करणे, याबाबत वन विभागाप्रती नागरिकांच्या मनात चीड व संतापाची भावना निर्माण होणे, यावर शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

**(१५) श्रीमती मंजुळा गावित, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"जलजीवन मिशन अंतर्गत साक्री तालुक्यातील (जि.धुळे) २०७ गावांना नळाव्दारे पाणीपुरवठा योजनेची कामे गेल्या वर्षभरापासुन सुरू असणे, त्यापैकी २०३ गावांची कामे ग्रामीण पाणीपुरवठा विभागामार्फत तर ४ कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यंत्रणेव्दारे करण्यात येणे, उक्त कामे अतिशय निकृष्ट दर्जाची होत असल्याचे ग्रामस्थांकडून वारंवार संबंधित ठेकेदार व अधिकारी यांचे लक्षात आणून देण्यात येणे, तथापि त्याकडे संबंधित अधिकाऱ्यांचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी शासनाचे कोट्यवधी रुपये वाया जाण्याची शक्यता, परिणामी नागरिकांमध्ये वाढता तीव्र असंतोष, शासनाने उक्त कामाची तातडीने चौकशी करुन निकृष्ट दर्जाचे काम करणा-या ठेकेदारावर व त्याला पाठीशी घालणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व उपाययोजना."

**(१६) श्री. राजेश वानखडे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"अमरावती जिल्ह्यातील ता.अचलपूर, चांदूर बाजार, भातकुली, अमरावती मधील १०५ गावे वाढीव पाणीपुरवठा योजना जल जीवन मिशन अंतर्गत वर्ष २०२२-२३ मध्ये मंजूर होणे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाद्वारे करारनाम्यानुसार सदर योजना २०२५, जानेवारी पर्यंत देखभाल दुरुस्ती सह पूर्ण करणे नियोजित असणे, परंतु अद्यापही योजनेची भौतिक प्रगती हे केवळ ५२% व आर्थिक प्रगती ही ६० टक्के एवढीच असणे, कंत्राटदाराकडून मोठ्या प्रमाणात काम पूर्णत्वास नेण्यात दिरंगाई करणे, यामुळे नागरिकांची मोठ्या प्रमाणात नाराजी असणे, कामात एवढी दिरंगाई होऊन सुद्धा विभागाद्वारे कंत्राटदारावर अद्यापही कोणतीच दंडात्मक कार्यवाही न करणे, तीन वर्षापासून सुलभ पाणीपुरवठ्याची अपेक्षा करणाऱ्या नागरिकांचा अपेक्षा भंग होणे, एकूणच या परिस्थितीमुळे शासनाप्रती नागरिकांमध्ये निर्माण झालेला रोष, यावर शासनाने करावयची कार्यवाही व उपाययोजना."

**(१७) श्री. विजयसिंह पंडित, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"गेवराई (जि.बीड) तालुक्यातील १९२ गावांसाठी १७२ कोटी रुपये किंमतीच्या १७७ नळ पाणीपुरवठा योजना मंजुर असणे, वॅपकॉस प्रा.लि. या तांत्रिक सेवा पुरवठादार कंपनीचे कंत्राटदारांशी संगनमत असल्यामुळे त्यांचेकडून कामाच्या देखभाल व इतर कर्तव्यात अक्षम्य कसूर होत असणे, जिल्हा परिषद बीडच्या ग्रामीण पाणीपुरवठा योजना व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाच्या कर्मचाऱ्यांकडून कंत्राटदारांना सातत्याने पाठिशी घालण्याचा प्रयत्न होणे, काम पूर्ण करण्याचा कालावधी १२ ते १८ महिने असतानाही विहित कालावधीत काम पूर्ण न करणाऱ्या कंत्राटदाराविरुध्द दंडात्मक कारवाई झालेली नसणे, प्रगती कन्स्ट्रक्शन, लातूर यांसारख्या कंत्राटदार कंपन्यांनी बेकायदेशीररित्या योजनांची कामे टक्केवारी घेऊन सबलेट केलेली असणे, जलस्त्रोतांचे काम पूर्ण होण्यापूर्वी नियमबाह्यरित्या कोट्यवधी रुपयांची पाईप खरेदी होणे, गट निविदा करून सुरु केलेली योजनांची कामे मोठ्या प्रमाणावर प्रलंबित असणे, अनेक योजनांच्या कामा बाबत तक्रारी असतानाही संबंधित विभागाकडून तक्रारींबाबत कोणतीही कारवाई होत नसणे, शासनाचा हजारो कोटी रुपयांचा निधी अक्षरशः वाया जाणे, गेवराई विधानसभा मतदार संघातील जलजीवन मिशन अंतर्गत मंजुर कामाची गुणवत्ते संदर्भात चौकशी होण्याची गरज असणे, जिल्ह्यातील टंचाईग्रस्त नागरीकांना शासनाचे कोट्यवधी रुपये खर्च होऊनही शुध्द पाणी मिळत नसल्यामुळे जनतेत पसरलेला शासन विरोधी असंतोष व संतापाची भावना, त्यामुळे या बाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना."

**(१८) श्री. ज्ञानेश्वर कटके, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"रांजणगाव (जि.पुणे) एमआयडीसीतील महाराष्ट्र एनव्हायरो पॉवर कंपनीतून (M.E.P.L.)पक्रिया न केलेले घातक रसायनमिश्रित पाणी जलवाहिन्याद्वारे नदी-नाल्यात सोडले जात असणे, यामुळे शिरुर तालुक्यातील अन्नापूर व इतर सात गावातील शेतकऱ्यांच्या शेतीचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले असणे, तसेच या नागरीकांना कॅन्सरसारख्या दुर्धर आजार होण्याचे प्रमाण वाढणे, तसेच हे दुषित पाणी पिऊन शेतकऱ्यांचे पशुधनास निर्माण झालेला धोका, त्यामुळे या आठही गावातील नागरीकांनी सदरील कंपनीविरोधात वारंवार आंदोलने करावी लागणे, या प्रकरणी मा.पर्यावरण मंत्री, जिल्हाधिकारी,पुणे व तहसिल ऑफिस यांच्याकडे वारंवार तक्रार करण्यात येणे, परंतु कंपनीवर कारवाई करण्यात आलेली नसणे, याउलट एमआयडीसीने संपादित केलेले वाढीव क्षेत्र या कंपनीला देण्यात आलेले असणे, त्यामुळे एमआयडीसीने महाराष्ट्र एनव्हायरो पॉवर कंपनीला दिलेले वाढीव क्षेत्र रद्द करावे असा आठही ग्रामपंचायतीने ठराव पारीत केलेला असणे, सदर कंपनीकडून शेतकऱ्यांचे होत असलेले नुकसान लक्षात घेता महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ देखील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कळविण्यात येणे, परंतु कंपनीने तशी कारवाई अद्याप न करणे, परिणामी एमआयडीसीने दिलेले वाढीव क्षेत्र रद्द करण्याबाबत तसेच शासन तसेच कंपनीविरोधात जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, त्याबाबत शासनाची प्रतिक्रिया व शासनाची भुमिका."

**(१९) श्रीमती नमिता मुंदडा, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"बीड, जिल्हा रुग्णालयात कोविड काळात कोवीड-१९ साथरोग परिस्थती हाताळण्याठी रेमडीसीवर इंजक्शन वितरण, कंत्राटी कर्मचारी भरती व शासकीय निधीमध्ये मोठ्याप्रमाणात आर्थिक अनियमितता करून भ्रष्टाचार करण्यात आला असणे, याबाबत उपसंचालक, आरोग्य सेवा, लातूर. व जि.प.बीड. च्या लेखा व वित्त विभागाच्या पथकाने चौकशी करून अनियमितता झाल्याचे स्पष्ट केले असणे, व आरोग्य सेवा, मुंबई. यांच्या पथकाने सदर प्रकरणी चौकशी करून गंभीर आक्षेप नोंदवत संबंधितावर शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची शिफारस केली असणे, त्यानुसार शासनाने सध्याचे व तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अशोक थोरात व डॉ. सुर्यकांत साबळे यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कार्यवाहीसाठी दोषारोप पत्राबाबतची ज्ञापने निर्गमित करण्यात आली असणे, परंतु अद्याप ही संबंधीतावर कार्यवाही करण्यात आलेली नसणे, डॉ. अशोक थोरात यांच्या कार्यकाळात वरील प्रमाणे बीड येथे भ्रष्टाचार करण्यात आलेला असतांना व चौकशी समितीने त्यांना दोषी ठरवले असतांना ही अशा भ्रष्ट अधिकाऱ्यास परत बीड येथे जिल्हाशल्यचिकित्सक पदावर नियुक्ती देण्यात आली असणे, त्यामुळे जनतेतून रोष

व्यक्त करण्यात येत असणे, तेव्हा वरील प्रकरणी सध्याचे व तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. थोरात यांच्या सह इतर दोषींवर तातडीने गुन्हे दाखल करून कार्यवाही करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाय योजना."

**(२०) सर्वश्री. संतोष बांगर, मुरजी पटेल, संजय गायकवाड, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात आरोग्य विभागाच्या बॉम्बे नर्सिंग ॲक्टमधील तरतुदीनुसार कोणत्याही खासगी रुग्णालयास मृत रुग्णाचा मृतदेह बिल न भरल्याने अडविता येत नसणे, तरीदेखील कायद्यातील तरतुदींना पायदळी तुडवून बिलासाठी मृतदेह अडविले जात असल्याच्या घटना राज्यातील रुग्णालयांत आढळून येणे, यासाठी राज्यभरातील रुग्णालयांत तपासणी करण्यात येत असणे, राज्यात अंदाजित एकूण २४ हजार ४०० रुग्णालये असून, त्यापैकी आतापर्यंत १९ हजार ३८८ रुग्णालयांची तपासणी करण्यात आलेली असणे, तपासणीअंती सदर रुग्णालयांपैकी ०२ हजार ९३६ रुग्णालयांत नियमांचे पालन न करता बिलासाठी मृतदेह अडविले जात असल्याचे निदर्शनास येणे, काही ठिकाणी बिले भरून सुद्धा रुग्णांच्या नातेवाईकांना रुग्णाचा मृतदेह मिळविण्यासाठी अडचणी येत असणे, परिणामी बिलासाठी मृतदेह अडविणाऱ्या रुग्णालयांवर कारवाई करणे गरजेचे असणे, वारंवार अशा घटना घडत असल्याने लोकांच्या मनात शासनाप्रती चीड व असंतोष निर्माण होणे, यावर शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

**चार : सन २०२५-२०२६ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान. (पाचवा व शेवटचा दिवस)**

(१) गृहनिर्माण विभाग

(२) सार्वजनिक आरोग्य विभाग

(३) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

(४) आदिवासी विकास विभाग

**(मतास टाकावयाच्या मागण्यांची सूची स्वतंत्रपणे वितरीत केल्याप्रमाणे)**

**[चर्चारोध (गिलोटीन) सायंकाळी ०५.३० वाजता]**

**पाच : अल्पकालीन चर्चा (म.वि.स. नियम १०१ अन्वये) :-**

**(गुरुवार, दिनांक २० मार्च, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली म.वि.स. नियम १०१ अन्वये अल्पकालीन चर्चा)**

**सर्वश्री. प्रशांत बंब, किशोर जोरगेवार, योगेश सागर, रणधीर सावरकर, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील :-**

"केंद्र सरकारच्या शिक्षण विभागाने जाहीर केलेल्या 'परफॉर्मन्स ग्रेडिंग इंडेक्स (PGI) २.०' मध्ये राज्यातील शालेय शिक्षणाची स्थिती गंभीर असल्याचे निष्कर्ष काढण्यात आलेले असणे, 'असर' (Annual Status of Education Report) २०२४ च्या सर्वेक्षणानुसार राज्यातील सरकारी शाळांमधील तिसरी ते पाचवीच्या ५०% विद्यार्थ्यांना दुसरीचे पुस्तक वाचता येत नसणे, तर सहावी ते आठवीच्या ६५% विद्यार्थ्यांना साधा भागाकार करता येत नसल्याचे धक्कादायक वास्तव समोर येणे, एकूणच राज्यातील शिक्षणाचा विशेषतः प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांचा दर्जा अत्यंत खालावलेला असल्याने उच्च माध्यमिक, उच्च व तंत्र शिक्षणाच्या क्षेत्रातसुद्धा महाराष्ट्राची पिछेहाट होऊन राज्यातील भूमिपुत्रांना योग्य नोकऱ्या न मिळणे, शालेय शिक्षणाचा दर्जा खालावल्याने त्यानंतरच्या विविध स्पर्धा परिक्षा, संशोधन क्षेत्र, इंडस्ट्रीज आणि इतरही क्षेत्रात राज्यातील पदवीधर पदव्युत्तर गुणवत्ता प्रचंड कमी झालेली असणे, "बालकांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण (RTE)" या कायद्यानुसार प्रत्येक मुलाला दर्जेदार शिक्षणाचा अधिकार असून शालेय पायाभूत सुविधा, शिक्षक-विद्यार्थी गुणोत्तर आणि गुणवत्ता मानकांसाठी कठोर मानदंड सुनिश्चित करण्यात आलेले असणे, शिक्षकांच्या गुणवत्ता आणि दर्जा यामध्ये सातत्य नसल्याची बाब स्पष्ट होणे, त्यामुळे RTE कायद्यानुसार विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता आणि दर्जा संबंधी असलेल्या मुलभूत हक्कांवर गदा येत असणे, ही बाब अत्यंत गंभीर असून राज्याच्या सर्वांगीण विकासाशी संबंधित असणे, एकीकडे राज्यातील काही शिक्षक दुर्गम भागात, तुटपुंजी दळण-वळण आणि तांत्रिक पायाभूत सुविधा असतांना सुध्दा त्यावर मात करुन समर्पित होऊन दर्जेदार शिक्षण देत गुणवंत विद्यार्थी घडविण्याचे कार्य करीत असतांना त्याच व्यवस्थेतील बहुतांश शिक्षक कर्तव्याबाबत उदासीन तर आहेतच पण बेकायदेशिररित्या विविध संघटना निर्माण करुन त्यामाध्यमातून राजकारण करीत असणे, परिणामी शिक्षकांच्या अशा वागणुकीमुळे पालकांना शिक्षणात रस कमी होणे तसेच पटसंख्येच्या कारणावरुन संचमान्यता धोक्यात आलेली असणे, यास संबंधित शिक्षक ज्ञानदानाप्रती असलेल्या त्यांच्या नैतिक बांधिलकीबाबत बेपर्वा असणे जितके कारणीभूत आहे तितकेच जबाबदार शिक्षण विभागाचे संबंधित प्रशासन व पर्यवेक्षण असणे जे अस्तित्वात असलेल्या दर्जेदार शिक्षण हक्क कायदा, अनुषंगिक शासन निर्णय व तत्सम कायद्यांची अंमलबजावणी करण्यात कुचराई करीत असल्याची बाब निदर्शनास येणे, त्यामुळे एकूणच राज्यातील ढासळलेल्या शिक्षणाच्या दर्जाबाबत अत्यंत गांभीर्याने व प्राथमिकतेने त्वरित शासनाने करावयाची कार्यवाही आणि उपाययोजना."

**सहा : शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ, विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक २८ - महाराष्ट्र विनियोजन विधेयक, २०२५

**(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(क)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - महाराष्ट्र महामार्ग (सुधारणा) विधेयक, २०२५

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - महाराष्ट्र महामार्ग (सुधारणा) विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(क) विधानपरिषदेने संमत केल्याप्रमाणे विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ३ - महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) (सुधारणा) विधेयक, २०२५

**(ड) विधानपरिषदेने संमत केल्यास विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ४ - महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) (सुधारणा) विधेयक, २०२५

**सात : पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री यांचा म.वि.स नियम ११० अन्वये शासकीय ठराव:-**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र विधानसभेने व महाराष्ट्र विधानपरिषदेने, १ जून, १९८१ रोजी, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २५२ च्या खंड (१) च्या अनुसार ठराव केला होता आणि संसदेने पारित केल्याप्रमाणे, जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४ (१९७४ चा ६) आणि जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) (सुधारणा) अधिनियम, १९७८ (१९७८ चा ४४) अंगीकृत केले होते;

**आणि ज्याअर्थी,** संसदेने, जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४ यात, जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) (सुधारणा) अधिनियम, २०२४ (२०२४ चा ५) याद्वारे सुधारणा केली आहे;

**आणि ज्याअर्थी,** जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) (सुधारणा) अधिनियम, २०२४ याच्या कलम १ च्या पोट-कलम (२) मध्ये अशी तरतूद केली आहे की, जे राज्य, संविधानाच्या अनुच्छेद २५२ च्या खंड (१) तसेच त्याच्या खंड (२) अन्वये याबाबतीत पारित केलेल्या ठरावाद्वारे, २०२४ चा उक्त सुधारणा अधिनियम अंगीकृत करील अशा अन्य राज्यास, हा अधिनियम लागू असेल;

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र शासनाचे असे मत आहे की, जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) (सुधारणा) अधिनियम, २०२४ महाराष्ट्र राज्यात अंगीकृत करण्यात यावा;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २५२ च्या खंड (२) अनुसार, महाराष्ट्र विधानसभा, याद्वारे, असा ठराव करते की, संसदेने पारित केलेला, जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) (सुधारणा) अधिनियम, २०२४ (२०२४ चा ५) महाराष्ट्र राज्यासाठी अंगीकृत करण्यात यावा.

**आठ : (गुरुवार, दिनांक २० मार्च, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री रणधीर सावरकर, अर्जुन खोतकर, अब्दुल सत्तार, सुरेश भोळे, सुधीर मुनगंटीवार, चेतन तुपे, सुरेश धस, दिपक केसरकर, अनिल पाटील, प्रशांत बंब, डॉ.तानाजी सावंत, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री नारायण कुचे, रमेश बोरनारे, राजकुमार बडोले, देवराव भोंगळे, राजेश क्षिरसागर, प्रताप पाटील-चिखलीकर, अभिमन्यू पवार, विजय शिवतारे, धर्मराव आत्राम, प्रकाश भारसाकळे, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री चंद्रकांत नवघरे, चैनसुख संचेती, मंगेश कुडाळकर, दिलीप बनकर, श्रीमती श्वेता महाले, श्री. प्रकाश सुर्वे, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री प्रवीण दटके, किशोर पाटील, नरेंद्र भोंडेकर, मोहन मते, दौलत दरोडा, श्रीमती मंजुळा गावित, सर्वश्री राजू तोडसाम, प्रकाश सोळंके, संजय गायकवाड, राजेश वानखडे, संतोष बांगर, संजय बनसोडे, किसन वानखेडे, दिलीप लांडे, सत्यजित देशमुख, विनोद अग्रवाल, चंद्रकांत सोनवणे, दिलीप वळसे-पाटील, संभाजी निलंगेकर-पाटील, संतोष दानवे, राजेश पवार, शिवाजी कर्डिले, सचिन कल्याण-शेट्टी, श्रीमती नमिता मुंदडा, सर्वश्री रमेश कराड, रत्नाकर गुट्टे, डॉ.संजय कुटे, सर्वश्री प्रताप अडसड, राणाजगजितसिंह पाटील, बबनराव लोणीकर, तान्हाजी मुटकुळे, किसन कथोरे, सर्वश्रीमती मोनिका राजळे, सीमाताई हिरे, देवयानी फरांदे, सर्वश्री रविंद्र चव्हाण, संजय केळकर, हरिश पिंपळे, उमेश यावलकर, सुमित वानखेडे, श्रीमती श्रीजया चव्हाण, सर्वश्री प्रशांत ठाकूर, महेश बालदी, सर्वश्रीमती सई डहाके, स्नेहा दुबे, सुलभा गायकवाड, सर्वश्री योगेश सागर, भिमराव तापकीर, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री अतुल भातखळकर, शंकर जगताप, कृष्णा खोपडे, विक्रम पाचपुते, करण देवतळे, गोपीचंद पडळकर, अमल महाडिक, राहुल आवाडे, महेश लांडगे, चरणसिंग ठाकूर, अमोल जावळे, दिलीप बोरसे, डॉ. राहुल आहेर, ॲड. राहुल ढिकले, श्री. सुभाष देशमुख, डॉ. सुरेश खाडे, डॉ. अतुल भोसले, ॲड. राहुल कुल, सर्वश्री काशिराम पावरा, समीर मेघे, समीर कुणावार, विजय रहांगडाले, किर्तीकुमार भांगडिया, डॉ.आशिष देशमुख,**

**सर्वश्री विनोद अग्रवाल, संजय पुराम, किशोर जोरगेवार, राजेश बकाने, डॉ. मिलिंद नरोटे, सर्वश्री श्याम खोडे, केवलराम काळे, भीमराव केराम, जितेश अंतापुरकर, सिध्दार्थ शिरोळे, अनुपभैय्या अग्रवाल, राजेश पाडवी, श्रीमती अनुराधा चव्हाण, सर्वश्री शिवाजी पाटील, संजय उपाध्याय, चंद्रकांत पाटील, सुनिल शेळके, निलेश राणे, राजेंद्र यड्रावकर-पाटील, डॉ.किरण लहामटे, सर्वश्री शरद सोनवणे, किरण सामंत, आशुतोष काळे, हिरामण खोसकर, राजेश विटेकर, राजू कारेमोरे, शेखर निकम, सचिन पाटील, संग्राम जगताप, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"शेतकरी सुखी, तर राज्य सुखी" हा मंत्र व शेतकऱ्यांच्या हिताचा विचार केंद्रस्थानी ठेऊन राज्यातील बळीराजाला स्थैर्य देणे, त्याला बळकट करणे आणि शेतीला नैसर्गिक आपत्तीपासून वाचविण्यासाठी शाश्वत उपाययोजना करणे हे ध्येय समोर ठेऊन आणि नारी शक्ती व युवा शक्तीला प्राधान्य देऊन राज्यात विविध योजना गतीमानतेने कार्यान्वित करण्याचा, जन कल्याणाचा वसा घेतलेल्या या शासनाचा प्रयत्न असणे, "नमो शेतकरी महासन्मान निधी" योजनेत राज्यातर्फे प्रती शेतकरी ६ हजार रुपये देण्यात येत असणे, केवळ १ रुपयात पिक विमा देण्यात येत असून त्यायोगे महाकृषी विकास अभियान राबविण्यात येत असणे, नुकसानीचे पंचनामे जलद व पारदर्शी होण्यासाठी ई-पंचनामा प्रणाली तसेच ई-फेरफार, संगणकीय सातबारा उतारे यासारख्या योजना राबऊन पारंपारिक शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्यात आली असणे, शेतकऱ्यांचा आर्थिक आधार बळकट करण्यासाठी "मा.बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट)" प्रकल्प कार्यान्वित केला असणे, शेतमालाला बाजारपेठ मिळऊन देण्यासाठी शेतकरी ते खरेदीदार अशी मूल्य साखळी विकसित करण्यात आली असणे, "मागेल त्याला शेततळे" या योजनेला शेतकऱ्यांचा उदंड प्रतिसाद लाभल्याने त्यात फळबागा, ठिंबक सिंचन, शेडनेट, हरितगृहे, आधुनिक पेरणी यंत्रे, कॉटन श्रेडर यांचा समावेश करण्यात आला असणे, शेतक-यांसाठी महत्वाचे असणारे वैनगंगा पैनगंगा नदीजोड प्रकल्प, मराठवाडा वॉटर ग्रीड, POCRA टप्पा-२ तसेच, जलयुक्त शिवार टप्पा-२ यासारखे महत्वाकांक्षी प्रकल्प तातडीने मार्गी लावण्याचे प्रयोजन असणे, मविआकडून शेतक-यांना नैसर्गिक आपत्तीसाठी नुकसान भरपाई म्हणून केवळ ८,७०१ कोटी निधी वितरित करण्यात आला असताना विद्यमान शासनाच्या काळात हाच निधी १६,३०९ कोटी वितरित केला असणे, राज्यातील शेतकरी बांधवांना दिवसा वीज मिळावी याकरिता राज्यातील सर्व सब स्टेशनच्या परिसरात सोलर पार्क उभारण्याचे प्रयोजन असणे, याद्वारे निर्माण झालेल्या विजेचा वापर कृषी फिडर्सना पुरवठा करण्यासाठी अपेक्षित असणे, राज्यात जगातील सर्वात मोठा ९ हजार मेगावॅट क्षमता असलेला डिस्ट्रब्युटेड रिन्युएबल एनर्जी प्रकल्प उभारण्यात येत असणे, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० मुळे ५० टक्के कृषी फिडर्स सौरऊर्जेवर चालविणे शक्य होणार असणे, विद्यमान शासनाने शेतक-यांना सिंचनासाठी "मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना" जाहिर केली असणे, या शासनाने "मागेल त्याला सौरकृषी पंप योजना" सुरु केली असल्याने शेतक-यांना केवळ १० टक्के रक्कम भरुन सौर पॅनल्स व पंपासहित सर्व सिंचन सुविधा प्राप्त होणे, दलित आणि आदिवासी शेतकऱ्यांना तर

ही रक्कम केवळ ५ टक्के भरावी लागणे, राज्यात शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्वाचे पांदण रस्ते तातडीने पूर्ण करण्याकरिता "मातोश्री पांदण रस्ते योजना" शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने अधिक सुटसुटीत करुन राबविण्याची आवश्यकता, या शासनाच्या काळात २७ सिंचन प्रकल्पांना मान्यता देण्यात आली असणे, परिणामी विशेषतः मराठवाडा व विदर्भातील शेतकऱ्यांना वर्षातून एकापेक्षा जास्त पिके घेणे शक्य झाले असणे, राज्यात जलयुक्त शिवार, गाळमुक्त धरण, गाळमुक्त शिवार, मागेल त्याला शेततळे इ. योजना एकत्रितपणे राबविल्याने केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाने जाहिर केलेल्या भारतातील जलाशयांच्या गणनेत महाराष्ट्राचा पहिला क्रमांक आला असल्याचे निदर्शनास येणे, हे अभियान देशातील अन्य राज्यांसाठी एक आदर्श व पथदर्शी झाले असणे, कर्जबाजारी शेतक-यांना आधार देऊन कर्जमुक्त करण्यासाठी "महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना" सुरु करण्यात आली असणे, कांद्याला योग्य भाव मिळावा याकरीता कांद्याचे दर ठरविण्याचे अधिकार केंद्राच्या ग्राहक संरक्षण मंत्रालयाने स्वतःकडे ठेवले असणे, तूर हे जिरायती शेतक-यांचे पिक असून ते नैसर्गिक आपत्तीत तग धरणारे, कमी खर्चाचे व आंतरपिक पध्दतीने घेता येणारे असल्याने त्याची उत्पादकता वाढविण्यासाठी प्रोत्साहन देण्याची आवश्यकता, कापूस लागवड ते वेचनी यातील बहुतांश कामे मंजुरांऐवजी यांत्रिकीकरणाच्या माध्यमातून करणे आवश्यक असून हमी भावाने कापूस खरेदीसाठी सीसीआयने उघडलेल्या केंद्राची संख्या वाढविण्याची आवश्यकता, किंमत स्थिरीकरण योजनेंतर्गत नाफेडने २.२२ लाख मे.टन व एनसीसीएफ अंतर्गत ०.३५ लाख मे. टन कांदा खरेदी केला असणे, हमीभावाने कापूस खरेदीसाठी सी.सी.आयने राज्यात १२१ खरेदी केंद्रे मंजूर केली असणे, कापूस प्रक्रिया उद्योगातील सर्व घटकांना काही सवलती देण्याची आवश्यकता, कापूस, सूत, कापड निर्यातीच्या संधी उपलब्ध करण्याची आवश्यकता, १२ व्या पंचवार्षिक योजनेत अन्नधान्याच्या गरजेसोबतच नगदी पिकांचीही गरज भागविण्यासाठी कापूस पिकाचा समावेश करण्यात आला असणे, कापूस आधारित पिक पध्दतीस चालना देणे, कापूस पिकात एकात्मिक किड व्यवस्थापनास चालना देणे, अधिक लांब धाग्याच्या कापसांच्या वाणांची प्रात्यक्षिके आयोजित करून कापूस उत्पादकास चालना देण्याचे या शासनाचे धोरण असणे, कापसासाठी ५०० व सोयाबीन साठी २७० शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला असणे, धानाला २० हजार रुपये बोनस देण्याचा निर्णय या शासनाने घेतल्याने त्याचा ६ लाख शेतकऱ्यांना लाभ मिळणे, 'नारीशक्ती दुत ॲप' हे क्रांतिकारी ॲप्लीकेशन शासनाने सुरु केल्याने ते गरजू महिलांना ओळखण्यासाठी व सक्षम करण्यासाठी उपयुक्त ठरत असणे, राज्यातील युवकांना स्पर्धेच्या युगात शक्तीशाली स्पर्धक म्हणून उभे राहता यावे याकरिता युवा प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यात आली असणे, युवकांना विविध उपक्रमांमध्ये सहभागी होण्याच्या दृष्टीने त्यांना वसतीगृहाची, निवासाची कुठेही अडचण येऊ नये या उद्देशाने राज्यातील ६ महसूल विभागात १०० युवक-युवतींसाठी युवा वसतीगृह उभारण्यास मान्यता देण्यात आली असणे, राज्यात पर्यटनाला चालना देण्यासाठी शाश्वत पर्यटन धोरण आखण्यात येत असणे, राज्यातील ५० नवीन पर्यटन स्थळांची निवड करून त्या ठिकाणी थीम पार्क, ॲडव्हेंचर स्पोर्ट, शॉपिग मॉल, वॉटर मॉल आणि निवास व्यवस्था करण्यात येत असणे, बुलढाणा येथील लोणार, अंजिठा-वेरुळ, कळसूबाई,

त्र्यंबकेश्वर तसेच कोकणातील सागरी किल्ल्यांच्या ठिकाणी पर्यटकांसाठी उच्च दर्जाच्या सुविधा निर्माण करण्यात येत असणे, सातारा येथील शिवसागर जलाशय, भंडाऱ्यातील गोसीखुर्द जलाशय तसेच जळगाव येथील वाघूर जलाशय येथे नाविन्यपूर्ण जलपर्यटन प्रकल्प राबविण्यात येत असणे, कोकणातील पर्यटनास चालना देण्यासाठी शिवकालीन ३२ गडकिल्ल्यांचे नुतनीकरण व संवर्धन करण्याचे प्रस्तावित असणे, राज्यातील पर्यटकांना व भाविकांना योग्य दरामध्ये उत्तम व सुरक्षित सुविधा पुरविण्यासाठी श्रीनगर, जम्मु काश्मीर आणि अयोध्या येथे महाराष्ट्र भवन बांधण्याचा निर्णय घेतला असणे, राज्यात शेतकरी कर्जमुक्त व सधन होऊन शेतकरी, शेतमजुर, महिला व युवकांना बळकट करण्यासाठी, पर्यटनाला चालना मिळण्यासाठी व लोक कल्याणकारी आणि गतीमान राज्य निर्माण करण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**नऊ : (गुरुवार, दिनांक २० मार्च, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री आदित्य ठाकरे, विजय वडेट्टीवार, जयंत पाटील, भास्कर जाधव, नाना पटोले, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. सुनिल प्रभू, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री रोहित पाटील, दिलीप सोपल, अमीन पटेल, रोहित पवार, अजय चौधरी, अमित देशमुख, उत्तमराव जानकर, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री अस्लम शेख, संदिप क्षिरसागर, कैलास घाडगे-पाटील, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री बापूसाहेब पठारे, सुनिल राऊत, अमित झनक, नारायण पाटील, संजय पोतनीस, विकास ठाकरे, अभिजीत पाटील, नितीन देशमुख, शिरीषकुमार नाईक, राजू खरे, वरुण सरदेसाई, संजय मेश्राम, अनंत (बाळा) नर, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री हारुन खान, साजिद खान पठाण, महेश सावंत, हेमंत ओगले, मनोज जामसुतकर, रामदास मसराम, गजानन लवटे, अनिल मांगुळकर, सिध्दार्थ खरात, संजय देरकर, बाबाजी काळे, प्रविण स्वामी, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (मंत्र्यांचे उत्तर)**

"जुलै, २०२४ मध्ये राज्य सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना लागू करणे, सदर योजनेमध्ये तब्बल २ कोटी ६३ लाख लाडक्या बहिणींची नोंदणी करणे व त्यांना रु. १५००/- दरमहा अनुदान देण्यास सुरुवात करणे, योजनेच्या निकषांचे उल्लंघन करुन गैरफायदा घेतलेल्या लाडक्या बहिणींच्या अर्जांची छाननी माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये सुरु करणे, अनेक बहिणींनी स्वतःहून अर्ज मागे घेणे व लाखों बहिणींचे अर्ज छाननीमध्ये बाद करण्यात येणे, प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी) गणपतीच्या मूर्तीवर असलेली बंदी, सदर बंदीमुळे माघी गणेश जयंतीच्या मूर्तीच्या विसर्जनाची झालेली कोंडी, अद्यापही माघी गणपतींच्या मूर्तीचे विसर्जन न झाल्यामुळे भाद्रपद महिन्यातील गणेश मूर्तीच्या (पीओपी) विसर्जनाच्या आखलेल्या उपाययोजनांवर प्रश्न निर्माण होणे, पीओपी व्यतिरिक्त अन्य पर्याय उपलब्ध नसल्यामुळे गणेश भक्त व मूर्तीकार यांच्यामध्ये पसरलेले चिंतेचे वातावरण, मुंबई महानगर प्रदेशातील रस्ते वाहतूक, मेट्रो रेल्वे या सार्वजनिक वाहतूक सेवा अपुऱ्या असल्यामुळे 'केबल कार' वाहतूक सेवा सुरु करण्यासाठी आराखडा तयार करणे, राज्यातील धार्मिक स्थळांना जोडण्यासाठी शक्तीपीठ मार्ग शासनाने

अप्रकाशित

आखणे, सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी निधीची तरतूद करण्याची आवश्यकता, राज्यातील शहरी तसेच ग्रामीण भागातील रस्त्यांची झालेली दुरावस्था, पावसाळयापूर्वी सदर रस्ते वाहतूकीसाठी योग्य करण्याची आवश्यकता, राज्यातील शहरी व ग्रामीण भागातील अनेक तरुण बेरोजगार असणे, त्यांना रोजगार उपलब्ध करण्याची आवश्यकता, राज्यातील द्राक्ष बागायतदारांचे कमी भावामुळे झालेले नुकसान, महाशिवरात्री हा दिवस द्राक्ष दिन म्हणून साजरा करून राज्यातील शेतकऱ्यांना हातभार लावण्याची आवश्यकता, राज्यात राजरोसपणे डान्सबार मोठ्या प्रमाणावर सुरु असणे, पोलिसांचे डान्सबारवर बंदी आणण्यास जाणीवपुर्वक होत असलेले दुर्लक्ष, राज्यात मागेल त्याला सौर पंप योजनेतील जाचक अटींमुळे अनेक शेतकरी सदर योजनेपासून वंचित असणे, राज्यात विविध समाजांसाठी १८ महामंडळे स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात येणे, परंतु त्यांना निधी न दिल्यामुळे त्यांची कामे प्रत्यक्षात सुरु न होणे, सध्याचे सरकार शेतकऱ्यांच्या बाबत गंभीर नसल्याचे निदर्शनास आले असून निवडणूकीपुर्वी शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफीची घोषणा करुनही अद्याप कर्जमाफीबाबत कोणताही निर्णय घेतलेला नसणे, तसेच विदर्भातील धान, सोयाबीन, कापूस इत्यादी पिकांना बाजारभाव मिळत नसणे, इतर पिकांना हमीभाव मिळण्याची गरज असणे, तसेच राज्यातील अनेक रस्त्यांची विकासाच्या नावाखाली अत्यंत दुरावस्था झाली असल्याने या रस्त्यांवरील अपघातांचे प्रमाणात वाढ झालेली असणे, रस्ते अपघातांमुळे मागील काही महिन्यांपासून अनेक बळी जाणे व अनेक जण गंभीर जखमी होणे, त्यामुळे वाहनातून प्रवास करणाऱ्या वाहतुकदारांना जीव मुठीत ठेवून प्रवास करावा लागत असणे या सर्व बाबींमुळे राज्यातील शेतकरी, महिला वर्ग व सर्वसामान्य जनतेत असंतोष पसरला असून याबाबत राज्य शासनाने करावयाची उपाययोजना व करावयाची कार्यवाही."

**दहा : (गुरुवार, दिनांक २० मार्च, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री अतुल भातखळकर, अर्जुन खोतकर, दिलीप वळसे-पाटील, संजय केळकर, दिपक केसरकर, प्रकाश सोळंके, राम कदम, विजय शिवतारे, दौलत दरोडा, रविंद्र चव्हाण, रमेश बोरनारे, अनिल पाटील, अमित साटम, मंगेश कुडाळकर, चेतन तुपे, योगेश सागर, प्रकाश सुर्वे, संग्राम जगताप, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री राजेंद्र गावित, दिलीप बनकर, ॲड. पराग अळवणी, डॉ.बालाजी किणीकर, श्रीमती सुलभा खोडके, कॅ. आर. तमील सेल्वन, सर्वश्री अशोक पाटील, राजकुमार बडोले, मिहिर कोटेचा, शांताराम मोरे, राजू कारेमोरे, पराग शाह, दिलीप लांडे, चंद्रकांत नवघरे, कालिदास कोळंबकर, महेंद्र थोरवे, संजय बनसोडे, श्रीमती विद्या ठाकूर, श्री. महेंद्र दळवी, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री प्रवीण दटके, तुकाराम काते, सुनिल शेळके, मोहन मते, निलेश राणे, किसन कथोरे, राजेश क्षिरसागर, डॉ.किरण लहामटे, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री मुरजी पटेल, आशुतोष काळे, संजय उपाध्याय, विश्वनाथ भोईर, शेखर निकम, सर्वश्रीमती सना मलिक, देवयानी फरांदे, सर्वश्री किरण सामंत, विलास तरे, मंगेश चव्हाण, राजेश मोरे, हिरामण खोसकर, कुमार आयलानी, राजेश विटेकर, राजेश पवार,**

**विनोद अग्रवाल, रत्नाकर गुट्टे, शंकर जगताप, सिध्दार्थ शिरोळे, हेमंत रासने, भिमराव तापकीर, सुनिल कांबळे, रणधीर सावरकर, सुधीर मुनगंटीवार, समीर कुणावार, सुरेश भोळे, शिवाजी कर्डिले, देवराव भोंगळे, राजन नाईक, श्रीमती स्नेहा दुबे, सर्वश्री महेश लांडगे, नरेंद्र मेहता, श्रीमती सुलभा गायकवाड, श्री. प्रशांत ठाकूर, डॉ. सुरेश खाडे, सर्वश्री सत्यजित देशमुख, हरिश पिंपळे, प्रताप अडसड, डॉ.संजय कुटे, डॉ. मिलिंद नरोटे, सर्वश्री सुमित वानखेडे, अभिमन्यू पवार, श्रीमती सीमाताई हिरे, श्री. विक्रम पाचपुते, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"हे राज्य लोकांचे आहे आणि लोकांसाठी आहे" ही भावना मनामध्ये ठेऊन महायुतीचे शासन वेगाने कार्यरत असणे, मुंबई-पुणे व एमएमआरडीएसह राज्यातील अन्य छोटया शहरांमध्ये स्टार्टअप्सची संख्या वाढत असल्याने इंडिया स्टार्टअप्सनी घोषित केलेल्या आकडेवारीनुसार महाराष्ट्र हे स्टार्टअप्सचे देशातील पहिल्या क्रमाकांचे राज्य ठरले असणे, महायुती शासनाने महाराष्ट्रात अशक्य वाटणारा समृध्दी महामार्ग कार्यान्वित केला असणे, या महामार्गामुळे मुंबई-पुण्यात होणारी गुंतवणूक धुळे, गडचिरोली, नागपूर, अमरावती या भागात वाढत असल्याचे निदर्शनास येणे, नागपूर-गोवा शक्तीपीठ द्रुतगती मार्गाचे बांधकाम हाती घेण्याचा निर्णय घेतला असणे, या द्रुतगती मार्गामुळे, त्या मार्गावरील प्रमुख धार्मिक क्षेत्रे व तिर्थस्थळे जोडण्याचे प्रयोजन असून या प्रदेशातील आर्थिक विकासाला देखील चालना मिळू शकेल, राज्याच्या शहरी भागात पायाभुत सुविधांद्वारे शहरी जीवनमान सुधारण्यासाठी 'नगरोत्थान महाभियान' प्रभावीपणे राबविण्याचे प्रयोजन असणे, या योजनेंतर्गत पाणी पुरवठा, मलः निस्सारण व विकास यांचे सुरु असलेले प्रकल्प दोन वर्षात पूर्ण करण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आले असणे, मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असल्याने या शहरामध्ये गृहनिर्माण व गतीमान परिवहन हे मुद्दे प्राधान्याने विचारात घेऊन स्मार्ट सिटीच्या माध्यमातून स्थानिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाचा प्रयत्न असणे, मेट्रो-२ ए आणि २ बी ची सेवा सुरु झाल्याने पश्चिम द्रुतगती मार्गावरील अंधेरी आणि दहिसर च्या मध्ये वाहतुक कोंडी कमी होऊन मुंबईकरांचा प्रवास सुखकर झाल्याचे दिसून येणे, ठाणे-बोरीवली भुयारी मार्गाची निर्मिती करण्याचे धोरण प्रस्तावित असणे, मुंबई-पुणे मिसिंग लिंक या ६७०० कोटी रुपयांच्या प्रकल्पाचे काम सुरु असणे, वर्सोवा-वांद्रे सागरी सेतूची निर्मिती, शिवडी ते न्हावाशेवा या मुंबई पोरबंदर प्रकल्पाची निर्मिती जलदगतीने सुरु असणे, मुंबईतील कुर्ला येथील नेहरूनगर, टिळकनगर या म्हाडा वसाहतीतील अनेक इमारतींचा पुनर्विकास होऊन १० ते १५ वर्षे उलटल्यानंतरही त्यांना भोगवटा प्रमाणपत्र मिळाली नसल्याचे निदर्शनास येणे, या गृहनिर्माण वसाहतींसाठी लागू केलेल्या अभय योजनेची मुदत वाढविण्याची आवश्यकता, कुर्ला येथील रेल्वे हद्दीतील संतोषी माता नगर, साबळे नगर व क्रांतीनगर येथे अनेक वर्षे राहणा-या झोपडीधारकांना रेल्वे प्रशासनामार्फत पर्यायी जागा उपलब्ध करण्याकरिता राज्य शासनाने प्रयत्न करण्याची आवश्यकता, नेहरूनगर येथील म्हाडाच्या वसाहतीत राहणा-या पोलीस कर्मचा-यांना माफक दरात निवासस्थाने उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, राज्यभरात ४०९ नागरी समुहांमध्ये 'प्रधानमंत्री आवास योजना' (शहरी)' राबविण्याचे प्रयोजन असणे, या योजनेंतर्गत २ लाखांपेक्षा अधिक घरे बांधण्यात आली असून, १ लाख ८५ हजारांपेक्षा

अधिक घरांचे बांधकाम प्रगतीपथावर असणे, मेट्रो तसेच कोस्टल रोड प्रकल्प पूर्ण झाल्याने मुंबईकरांचे जीवनमान उंचावणे, मुंबईतील कोळीवाडा आणि गावठाणाकरिता सीमांकन करून वेगळी विकास नियंत्रण नियमावली तातडीने तयार करण्याची आवश्यकता, कोळीवाडे व गावठाणांची झालेली दुरवस्था तातडीने दूर करण्याची आवश्यकता, पुण्यातील सहकारी गृहनिर्माण संस्था व वसाहतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन पुनर्विकास करण्याची आवश्यकता, पुणे शहरात विमानतळाकरिता जागा राखीव असून अन्य पायाभुत सुविधा तातडीने करण्याची आवश्यकता, पुण्यातील जुन्या ब्रिटीशकालीन वाड्यांचा पुनर्विकास करण्याची आवश्यकता, जुन्या चाळींची व्याख्या बदलून हेरिटेज टिडीआर प्रत्यक्ष अंमलात आला असणे, एमएमआरडीए क्षेत्रात सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकासासाठी मुंबई जिल्हा बँकेला नोडल एजन्सी म्हणून मान्यता देण्यात येणे, मुंबईतील जुन्या इमारतींच्या स्वयंपुनर्विकासाकरिता मुंबई जिल्हा बँकेकडून देण्यात येणा-या कर्ज मर्यादेत वाढ करण्यात आली असल्याने गृहनिर्माण प्रकल्प वेगाने उभे रहात असल्याचे निदर्शनास येणे, मानीव अभिहस्तांतरण करण्यासाठी स्टॅम्प डयुटी भरण्यात सुलभता होण्यासाठी मुद्रांक शुल्क अभय योजना सुरु करण्यात येणे, झोपडपट्टी पुनर्वसन मधील सदनिका हस्तांतरण शुल्कात ५० टक्के कपात करण्याचा निर्णय घेण्यात येणे, राज्यात ५१ लाख घरे बांधण्याचे प्रस्तावित असणे, ठाणे शहरात एमआयडीसीच्या अभिन्यासातील १५०० हेक्टर भूखंडावर जगातील सर्वात मोठा क्लस्टर प्रकल्प राबविण्यात येणे, समुह विकास पध्दतीने हा प्रकल्प राबविण्याचे प्रयोजन असणे, वाशी येथील सध्याच्या दोन खाडी पुलांना समांतर अशा तिस-या सहा पदरी खाडी पुलाच्या प्रकल्पाचे काम सुरु असणे, नवी मुंबई विमानतळामुळे वाढणा-या लोकसंख्येसाठी नियोजित 'नैना' प्राधिकरणामार्फत २३ गावांच्या नियोजित आराखड्याच्या अंमलबजावणीस गती देण्याची आवश्यकता, मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर यासारख्या मोठ्या शहरांचा मेगापॉलिस मेटाव्हर्स प्रकल्पाच्या मदतीने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जागतिक पटलावरचे हे महानगर त्याच उच्च दर्जाचे व्हावे व येथील प्रत्येक कुटुंबात सुख आणि समाधान नांदावे ही या शासनाची महत्वाकांक्षा असणे, मुंबई व एमएमआरडीए क्षेत्रातील घरांची समस्या, वाहतुक समस्या इ. चे गतीमानतेने निर्मूलन करून मुंबईचा पर्यावरणपूरक विकास करण्याच्या दृष्टीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी.

**अकरा : (गुरुवार, दिनांक २० मार्च, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री विजय वडेट्टीवार, आदित्य ठाकरे, जयंत पाटील, नाना पटोले, भास्कर जाधव, डॉ. जितेंद्र आव्हाड, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री सुनिल प्रभू, रोहित पाटील, अमीन पटेल, दिलीप सोपल, रोहित पवार, अमित देशमुख, उत्तमराव जानकर, अस्लम शेख, डॉ. राहुल पाटील, श्री.संदिप क्षिरसागर, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री कैलास घाडगे-पाटील, बापूसाहेब पठारे, अमित झनक, सुनिल राऊत, नारायण पाटील, विकास ठाकरे, संजय पोतनीस, अभिजीत पाटील, शिरीषकुमार नाईक, नितीन देशमुख, राजू खरे, संजय मेश्राम, वरुण सरदेसाई, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री अनंत (बाळा) नर, साजिद खान**

**पठाण, हारुन खान, हेमंत ओगले, महेश सावंत, रामदास मसराम, मनोज जामसुतकर, अनिल मांगुळकर, गजानन लवटे, सिध्दार्थ खरात, संजय देरकर, बाबाजी काळे, प्रविण स्वामी, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यात शासनाचे शेतकरी विरोधी धोरण व नैसर्गिक आपत्ती त्यामुळे राज्यातील शेतकरी अस्मानी संकटात सापडला असून सोयाबीन, कापूस, धान व इतर कृषी मालाच्या खरेदीला हमी भावापेक्षा कमी दर असणे, केंद्र सरकारच्या धोरणामुळे शेत मालाचे दर पडणे, शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणारी अवजारे व साहित्याच्या किंमतीमध्ये झालेली वाढ, त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून अजूनही राज्य शासनाने संपूर्ण कर्जमाफीची घोषणा न करणे, मागसवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम अद्याप न मिळणे, मागासवर्गीयांसाठी असलेल्या वसतीगृहांची अवस्था अत्यंत भयावह असून या वसतीगृहांमध्ये सोयी-सुविधांचा अभाव असणे, राज्यात ओबीसी समाजाची लोकसंख्या सर्वाधिक असूनही त्या प्रमाणात महाज्योतीला निधी न मिळणे त्यामुळे ओबीसी विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेली नाराजी, सार्थी, बार्टी, महाज्योतीला मिळणाऱ्या अपुऱ्या निधीमुळे विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती वेळेवर न मिळणे, विदर्भातील अनेक जिल्हयात कोळसा खाणी, औष्णिक विज प्रकल्प, स्टील प्लांट यामुळे या जिल्हयांमध्ये प्रदुषणात मोठी वाढ होऊन आरोग्याचा प्रश्न व पर्यावरणाची हानी होत असणे, वनक्षेत्रालगत नागरी वस्त्यांमध्ये वन्य प्राण्यांमुळे शेतीचे नुकसान व मनुष्य हानी होत असणे, विदर्भातील प्रमुख प्रकल्प असलेला गोसीखुर्द प्रकल्पाचे काम अद्यापही प्रलंबित असल्याने या प्रकल्पाला नवीन सुप्रमा देऊन त्यासाठी निधी उपलब्ध करण्याची आवश्यकता, वाढती महागाई लक्षात घेता बांधकामांच्या वस्तुंच्या दरात वाढ झाल्यामुळे घरकुल योजनेत पाच लाखांपर्यंत अनुदानात वाढ करण्याची आवश्यकता, सार्वजनिक आरोग्य विभागात मोठ्या प्रमाणात घोटाळा झाला असून १०८ रुग्णवाहिका खरेदीमध्ये झालेला गैरव्यवहार, शासकीय रुग्णालये, आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे यांच्या साफ-सफाईसाठी प्रतीवर्षी ६३८ कोटी या प्रमाणे ३१९० कोटी रुपयाचे कंत्राट पुण्यातील एका खाजगी कंपनीला दिल्याचे उघड होणे, राज्यात एम.डी.ड्रग्ज, ब्राऊन शुगरची तस्करी मोठया प्रमाण वाढली असणे, ड्रग्ज तस्करांचे थैमान माजले असून त्यांच्यावर नियंत्रण राहिलेले नसणे, तसेच बनावट व अवैध दारु विक्री होत असल्याने निरपराध लोकांचे नाहक जाणारे बळी, राज्यातील अनेक मंत्र्यांवर विविध गंभीर स्वरुपाचे आरोप होऊनही त्यांना अभय देण्यात येणे, कोकणातील सिंधुदुर्ग जिल्हयासह रत्नागिरी जिल्ह्यात काजू उत्पादकांसमोर दरवर्षी पाऊस, ढगाळ वातावरण, अवकाळी पाऊस, वादळी वारे, आदी नैसर्गिक संकटांचा सामना करावा लागणे, आंबा, काजू, फणस इत्यादि पिकांचे होत असलेले नुकसान, त्यातच काजू बीचे दर, आयात शुल्क, पीक परतावा अशा समस्या असतांनाच आता काजू बी आणि बोंड खाणाऱ्या किडींचा मोठया प्रमाणात प्रादुर्भाव काजू पिकांवर होत असल्याचे नुकतेच माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास येणे, किडीच्या प्रतिबंधाकरीता किटकनाशकांची फवारणी करुनही कीड नियंत्रणात आलेली नसणे, परिणामी काजू बोंडांचे मोठ्या प्रमाणात होत असलेले नुकसान, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने काजू उत्पादक शेतकऱ्यांना तात्काळ पंचनामे करुन नुकसान भरपाई देण्याची आवश्यकता, मुंबईतील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील

१/१/१९९५ पर्यंतच्या पात्र झोपडपट्टीवासियांनी शासनाकडे प्रत्येकी ७ हजार रुपये भरणा करणे, सन २०११ च्या जनगणनेमध्ये ज्या झोपड्यांना कायमस्वरुपी वास्तव्याचा हक्क प्राप्त होऊनही यामध्ये म्हाडातर्फे सदर घरे देण्यामध्ये होत असलेला विलंब, शासनाच्या जमिनीवरील झोपड्यांना शौचालय, वीज, पाणी इत्यादी मुलभूत सोयी पुरविण्याबाबत संजय गांधी उद्यानाच्या अधिकाऱ्यांकडून ना हरकत प्रमाणपत्र देण्यास होत असलेला विलंब, सदर झोपडपट्टीवासियांनी कॉमन मीटर घेऊन वीज घेतली आहे त्यांना अदानी वीज कंपनीकडून भरमसाठ बिले देण्यात येणे, त्यामुळे झोपडपट्टीवासीय त्रस्त होणे, प्रत्येक झोपडीमागे स्वतंत्र वीज मीटर देण्याची झोपडपट्टीवासियांची मागणी असणे, त्यांना स्वतंत्र वीज मीटर देण्याबाबत शासनाने केलेली कार्यवाही, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेनुसार दिनांक १/१/२००० रोजीच्या वास्तव्याचा कोणताही एक पुरावा दिल्यास झोपडीधारक पात्र होणे, तथापि मुंबई महानगरपालिकेमध्ये दिनांक १/१/२००० रोजीच्या पुर्वीचे दोन पुरावे असतील तरच झोपडी पात्र केली जाणे, फोटो पासची पडताळणी करण्यास विलंब होणे, त्यामुळे महानगरपालिकेतर्फे झोपडी पात्र न करणे किंवा केली तर सशुल्क पात्र करणे, मुंबईतील वांद्रे (पूर्व) स्टेशनजवळ मोठ्या प्रमाणावर ऑटोरिक्षा सकाळ संध्याकाळ उभे असणे, जवळ जाणाऱ्या प्रवाशांना नकार देणे, मिटरप्रमाणे भाडे न आकारता जादा भाडयाची मागणी करणे, प्रवाशांबरोबर अरेरावी करणे, मुजोर ऑटोरिक्षा चालकांवर कारवाई करण्याची गरज, वांद्रे परिसरात गेल्या वर्षभरात अनेक चोरीच्या घटना घडणे, अंमली पदार्थांचा बेकायदेशीर साठा करणे, या संदर्भात स्थानिक पोलिसांकडे तक्रारी करुनही पोलिसांचे होत असलेले दुर्लक्ष, राज्यातील महत्वाच्या समस्यांकडे व प्रश्नांकडे राज्य शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे जनमानसात पसरलेला तीव्र असंतोष याबाबत राज्य शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**बारा : (गुरुवार, दिनांक २० मार्च, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री योगेश सागर, अर्जुन खोतकर, दिलीप वळसे-पाटील, प्रवीण दटके, अब्दुल सत्तार, प्रकाश सोळंके, सुधीर मुनगंटीवार, डॉ.तानाजी सावंत, सर्वश्री दौलत दरोडा, रणधीर सावरकर, दिपक केसरकर, अनिल पाटील, रविंद्र चव्हाण, विजय शिवतारे, चेतन तुपे, मोहन मते, कृष्णा खोपडे, रमेश बोरनारे, संग्राम जगताप, समीर मेघे, मंगेश कुडाळकर, दिलीप बनकर, अमित साटम, प्रकाश सुर्वे, राजकुमार बडोले, डॉ.आशिष देशमुख, सर्वश्री नरेंद्र भोंडेकर, राजू कारेमोरे, चैनसुख संचेती, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री चंद्रकांत नवघरे, समीर कुणावार, प्रदीप जैस्वाल, संजय बनसोडे, विनोद अग्रवाल, संजय गायकवाड, श्रीमती सरोज अहिरे, डॉ.संजय कुटे, सर्वश्री चंद्रकांत सोनवणे, सुनिल शेळके, सुमित वानखेडे, चंद्रदिप नरके, डॉ.किरण लहामटे, सर्वश्री अभिमन्यू पवार, राजेश क्षिरसागर, आशुतोष काळे, सचिन कल्याण-शेट्टी, महेश शिंदे, शेखर निकम, सुरेश धस, सुहास कांदे, श्रीमती सना मलिक, सर्वश्री हरिश पिंपळे, महेंद्र दळवी, हिरामण खोसकर, प्रकाश भारसाकळे, दिलीप लांडे, राजेश विटेकर, विजय रहांगडाले, निलेश राणे, अतुल भातखळकर, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री देवराव भोंगळे,**

**आमश्या पाडवी, अण्णा बनसोडे, डॉ. मिलिंद नरोटे, श्रीमती मंजुळा गावित, सर्वश्री राजेंद्र गावित, किशोर जोरगेवार, अमोल पाटील, किर्तीकुमार भांगडिया, हिकमत उढाण, ॲड. श्रीजया चव्हाण, सर्वश्री अमोल खताळ, संजय केळकर, संतोष दानवे, विठ्ठल लंघे, प्रशांत बंब, चरणसिंग ठाकूर, सर्वश्रीमती रंजनाताई जाधव, देवयानी फरांदे, सर्वश्री बाबुराव कदम-कोहळीकर, सुहास बाबर, नारायण कुचे, किरण सांमत, राजेश पवार, विलास भुमरे, संभाजी निलंगेकर-पाटील, शरद सोनवणे, डॉ.अतुल भोसले, सर्वश्री राजेंद्र यड्रावकर-पाटील, सुभाष देशमुख, डॉ.अशोकराव माने, सर्वश्री राजेश मोरे, शिवाजी पाटील, आनंद तिडके, किशोर पाटील, संजय पुराम, मुरजी पटेल, महेंद्र थोरवे, किसन वानखेडे, तान्हाजी मुटकुळे, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री अशोक पाटील, विलास तरे, बबनराव लोणीकर, शिवाजी कर्डिले, देवेंद्र कोठे, सत्यजित देशमुख, रत्नाकर गुट्टे, सुरेश भोळे, राजेश बकाने, करण देवतळे, प्रताप अडसड, राजू तोडसाम, श्याम खोडे, श्रीमती सई डहाके, प्रविण तायडे, केवलराम काळे, उमेश यावलकर, राजेश वानखडे, गोपीचंद पडळकर, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"नागपूर कराराचे उद्दीष्ट डोळ्यासमोर ठेऊन नागपूरसह विदर्भाच्या विकासाला चालना देण्याकरीता विद्यमान शासन कटीबध्द असणे, नागपूर जवळील मिहानमध्ये सेझ अंतर्गत पायाभूत सुविधा निर्माण झाल्याने बोईंगच्या एमआरओसह अनेक उद्योगांनी नागपूरात येण्यास स्वारस्य दाखविल्याचे निदर्शनास येणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय नागपूर विमानतळाचे अद्ययावतीकरण आणि विस्तारीकरण हा नागपूरच्या विकासाचा मैलाचा दगड ठरणार असणे, विस्तारित विमानतळाच्या माध्यमातून ९,००,००० टन क्षमतेच्या कार्गोची हाताळणी होणार असणे, परिणामी, नागपूर विमानतळ मध्य भारतातील गेम चेंजर म्हणून सिध्द होणार असणे, नवीन विमानतळ ३,००,००० स्वे. फूट क्षेत्रात बांधले जाणार असल्याने व सध्याच्या धावपट्टीच्या शेजारी आणखी ६० मीटर रुंद आणि ४ हजार मीटर लांबीची धावपट्टी बांधण्यात येणार असल्याने तेथे एकाच वेळी १०० विमाने उभी राहण्याचे प्रयोजन असणे, मोठया औद्योगिक टाऊनशिपला लागून असलेले कार्गो हब आणि मोठे विमानतळ ही रचना विदर्भातील भविष्याच्या विकासाचे द्योतक ठरणार असणे, विमानतळाच्या विस्तारामुळे तेथून होणाऱ्या माल वाहतुकीची क्षमता वाढल्याने विदर्भातील सर्व उत्पादनांची निर्यात होण्यास गती मिळणार असणे व त्यामुळे सुमारे १ लाख लोकांना रोजगार उपलब्ध होणार असणे, रस्ते, रेल्वे, विमानतळ विकास यामुळे विदर्भ लॉजिस्टीक हब म्हणून विकसित होणार असणे, जानेवारी, २०२५ मध्ये दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेमध्ये ६३ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांशी सुमारे १५ लाख ७२ हजार कोटी रुपये इतक्या गुंतवणूकीच्या सामंजस्य करारावर स्वाक्ष-या झाल्याने महाराष्ट्र हे थेट परकीय गुंतवणूकीसाठी पसंतीचे राज्य असल्याचे स्पष्ट झाले असणे, देशातील एकूण थेट परकीय गुंतवणूकीच्या २९ टक्के गुंतवणूक राज्यात आली असणे, परिणामी, राज्यात १५ लाखांपेक्षा अधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध होणे, राज्य शासन आणि बजाज फिनसर्व्ह यांच्यात सुमारे ५ हजार कोटी रुपये गुंतवणूकीचा सामंजस्य करार करण्यात आल्याने ४० हजार रोजगारांची निर्मिती होणे अपेक्षित असणे, मुंबई महानगर विकास प्राधिकरणातील विकास केंद्राबाबत

कॅलिफोर्नियातील बर्कले युनिर्व्हसिटी समवेत सामंजस्य करार करण्यात येणे, सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्याबाबतीत महाराष्ट्र हे देशातील अग्रगण्य राज्य ठरले असणे, राज्यात मुंबई, पुणे व छत्रपती संभाजी नगर येथे जी-२० च्या विविध बैठका यशस्वीरित्या आयोजित करण्यात आल्या असणे, औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी आणि रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी राज्यातील विविध उद्योगांना सुमारे ६ हजार कोटी रुपये इतके गुंतवणूक प्रोत्साहन अनुदान वितरित करण्यात येणार असणे, राज्यातील औद्योगिकीकरणाला पाठबळ व प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत सुमारे ३,५०० एकर इतके औद्योगिक भूखंड वितरित करण्याचा निर्णय घेण्यात येणे, पुरवठा साखळीची कार्यक्षमता सुधारण्यासाठी आणि जागतिक दर्जाची व्यवसाय परिसंस्था निर्माण करण्यासाठी १० एकात्मिक औद्योगिक केंद्रे व एकात्मिक माल वाहतूक केंद्रे विकसित करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला असणे, सन २०२४-२०२५ या वर्षामध्ये बेरोजगार युवकांना उद्योगांशी जोडण्यासाठी व रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्यासाठी राज्यात जिल्हा स्तरावर ६११ 'पंडीत दीनदयाल रोजगार मेळावे' आयोजित केले असणे, त्यायोगे १९ हजारांपेक्षा अधिक उमेदवारांना नोकऱ्या प्राप्त झाल्याचे निदर्शनास येणे, राज्यातील जनतेचे आरोग्य सुदृढ ठेऊन प्रत्येक नागरिकाला 'आरोग्यम् सुखसंपदा' उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने शासनाने 'महात्मा जोतीराव फुले जनआरोग्य योजना' व 'आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना' या एकत्रित योजनांतर्गत लाखो रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया करण्यात आल्या असणे, राज्यात ३० वर्षावरील सर्व महिलांचे कर्करोग, मधुमेह, उच्च रक्तदाब, मोतीबिंदू, कान, नाक, घसा व इतर आजारांचे निदान व उपचार याकरीता राज्य शासनातर्फे प्रती जिल्हा २ कोटी रुपयांचा निधी देण्यात आला असणे, राज्यात शुन्य ते अठरा वर्षापर्यंतची बालके तसेच किशोरवयीन मुला-मुलींच्या सर्वांगीण आरोग्य तपासणीसाठी 'जागरुक पालक, सुदृढ बालक' हे अभियान राज्यभर राबविण्यात येणे, राज्यात ग्रामीण तसेच दुर्गम भागांमध्ये राहणा-या नागरिकांना प्रत्येक छोट्या आजारासाठी हॉस्पीटलमध्ये जावे लागू नये याकरिता 'हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' या योजनेंतर्गत महाराष्ट्रात ७०० दवाखाने सुरु करण्यात येणे, राज्यात विविध महापालिका व जिल्हा परिषदेतील औषधे, वैद्यकीय उपकरणे खरेदीतील अनियमिततेला पायबंद घालण्यासाठी "महाराष्ट्र वैद्यकीय खरेदी प्राधिकरण" स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात येणे, राज्यातील रस्ते, बंदरे, विमानतळ, रेल्वे, मेट्रो, वीज इ. पायाभूत सुविधा विकास क्षेत्रांसाठी निधी उभारणे आणि प्रकल्प राबविण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियंत्रणाखाली 'महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ' स्थापन करण्यात येणे, सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावरील कामे या महामंडळामार्फत करण्याचे प्रयोजन असणे, या योजनेंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत नागपूर येथील महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिर्व्हसिटीची इमारत, नागपूर जिल्हा न्यायालयाची विस्तारित इमारत, मुंबईतील माझगाव न्यायालयाची इमारत, राज्य उत्पादन शुल्क कार्यालयाची इमारत, जलभूषण बंगला, राजभवन इ. इमारतींचे बांधकाम अलीकडेच पूर्ण करण्यात येणे, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सर्व योजनांचे संनियंत्रण करण्यासाठी प्रोजेक्ट मॅनेजमेंट इन्फॉर्मेशन सिस्टीम (PMIS) ही संगणकीय प्रणाली विकसित करण्यात येणे, भिवंडी-कल्याण-शिळफाटा रस्त्याचे सहापदरी रुंदीकरण करण्यासाठी ५६१.८५ कोटी रुपयांच्या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्यात येणे, नाबार्ड-२८

अंतर्गत १,०३०.५२ कोटी रुपयांच्या ३८२ कामांना नाबार्ड कडून मंजुरी प्राप्त झाली असणे व राज्य शासनाने देखील त्यास प्रशासकीय मान्यता दिली असणे, सर्व समाज घटकांना सोबत घेऊन, सर्वसमावेशक, प्रगतिशील, पुरोगामी व विकसित महाराष्ट्र घडविण्यासाठी आणि महाराष्ट्राला अधिकाधिक समृध्दीकडे नेण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**तेरा : अंतिम आठवडा प्रस्ताव :-**

**(गुरुवार, दिनांक २० मार्च, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९२ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री जयंत पाटील, आदित्य ठाकरे, विजय वडेट्टीवार, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री भास्कर जाधव, नाना पटोले, रोहित पाटील, सुनिल प्रभू, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री रोहित पवार, दिलीप सोपल, अमीन पटेल, उत्तमराव जानकर, अजय चौधरी, अमित देशमुख, संदिप क्षिरसागर, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री अस्लम शेख, बापूसाहेब पठारे, कैलास घाडगे-पाटील, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री नारायण पाटील, सुनिल राऊत, अमित झनक, अभिजीत पाटील, संजय पोतनीस, विकास ठाकरे, राजू खरे, नितीन देशमुख, शिरीषकुमार नाईक, वरुण सरदेसाई, संजय मेश्राम, अनंत (बाळा) नर, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री हारुन खान, साजिद खान पठाण, महेश सावंत, हेमंत ओगले, मनोज जामसुतकर, रामदास मसराम, गजानन लवटे, अनिल मांगुळकर, सिध्दार्थ खरात, संजय देरकर, बाबाजी काळे, प्रविण स्वामी, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९२ अन्वये प्रस्ताव :**

"राज्यात कायदा व सुव्यवस्थेची निर्माण झालेली गंभीर परिस्थिती, महिलांवरील अत्याचार व बलात्कारांच्या घटनेत दिवसेंदिवस होत असलेली वाढ, नातेवाईकांकडून लहान मुली व महिलांवर करण्यात येत असलेला अत्याचार व बलात्काराच्या घटना, शाळेत शिकणाऱ्या लहान बालिकासुद्धा सुरक्षित नसणे, राज्याची उपराजधानी असलेल्या नागपूर येथे सातत्याने खून, मारामाऱ्या व मोठ्या प्रमाणात दंगली होत असल्याने कायदा व सुव्यवस्थांचे धिंडवडे निघणे, अंमली पदार्थांची मोठ्या प्रमाणात तस्करी व तरुणांकडून याचे सेवन यांस होत नसलेला प्रतिबंध, पुण्यातील स्वारगेट एस.टी. स्थानकात शिवशाही बस मध्ये एका तरुणीवर करण्यात आलेला बलात्कार, मुक्ताईनगर येथे एका केंद्रीय मंत्र्यांच्या मुलीची छेड काढण्यात आल्यामुळे नागरिकांत पसरलेला असंतोष, हत्या, दरोड्यांचे व ऑनर किलिंगचे वाढलेले प्रमाण, राज्यात पोलिस दलाचे राजकीयकरण झालेले असून मोठ्या गुन्हेगारी टोळ्यांना राजकीय अभय मिळत असल्याने कायदा व सुव्यवस्था ढासळलेली असणे, बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या करण्यात आलेल्या भीषण हत्येतील मुख्य सुत्रधाराला पकडण्यात पोलिसांना आलेले अपयश, या हत्याकांडातील आरोपींना पोलिसांकडून देण्यात येत असलेले अभय, राज्यात बरेच ठिकाणी मागासवर्गीय व्यक्तींवर होत असलेले अत्याचार, संविधानाचा अवमान झाल्याप्रकरणी परभणी येथे शांततेने आंदोलन करीत असताना पोलिसांनी लाठीचार्ज करत श्री. सोमनाथ सुर्यवंशी यांना पोलिस ठाण्यात नेऊन केलेल्या प्रचंड मारहाणीमुळे पोलिस कोठडीत त्यांचा

झालेला दुर्देवी मृत्यू, अद्यापही संबंधित दोषी पोलिसांविरुद्ध न झालेल्या कारवाईमुळे मागासवर्गीय समाजात पसरलेला तीव्र असंतोष, बीड जिल्ह्यातील परळी शहरात महादेव मुंडे या व्यावसायिकाची झालेली निर्घुण हत्या, अद्यापही त्यांच्या मारेकऱ्यांना पकडण्यात पोलिसांना आलेले अपयश, मुंबईत गेल्या अकरा महिन्यात जबरी चोरी, घरफोडी व दरोड्याच्या ४८,३४३ घटना घडणे, याच कालावधीत १०१ लोकांच्या करण्यात आलेल्या हत्या, अशा प्रकारच्या गुन्हेगारी घटना अद्यापही थांबलेल्या नसणे, पोलिसांचा गुंडांवर वचक राहिलेला नसणे, बुलढाणा जिल्ह्यातील कैलास नांगरे या राज्यशासनाच्या युवा पुरस्कार प्राप्त युवकाने शेतीला पाणी मिळावे यासाठी केलेली आत्महत्या, राज्यातील वाढलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या व त्यांना मिळत असलेली तुटपुंजी मदत, राज्यातील एकंदरीतच रखडलेले सिंचनाचे प्रकल्प, शेतमालाचे पडलेले भाव व त्यास जबाबदार असलेले केंद्र व राज्य शासनाचे धोरण, यामुळे शेतकऱ्यांचे होत असलेले नुकसान, इंटरनॅशनल टूरिझम फेस्टीवल प्रा. लि. या कंपनीने केंद्र सरकारच्या "दादासाहेब फाळके इंटरनॅशनल फिल्म फेस्टीवल" या ट्रेडमार्कचा गैरवापर करुन व शासनाचा कार्यक्रम असल्याचे भासऊन कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार करणे, बीड जिल्ह्यातील केळगाव येथील आश्रम शाळेत शिक्षक श्री. धनंजय नागरगोजे अठरा वर्षापासून काम करत असणे, परंतु वेतन न मिळाल्यामुळे त्यांनी केलेली आत्महत्या, शासनाने सन २०२३ साली कायम विनाअनुदानित शाळांना वाढीव टप्पा अनुदान मंजूर केलेले असणे, परंतु अद्यापही त्याची अंमलबजावणी न झाल्याने अशा शाळेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांवर आलेली उपासमारीची वेळ, दिव्यांग शाळांना व दिव्यांगांच्या कायम विनाअनुदानित शाळांना जुलै, २०२४ मध्ये अनुदान देण्याची केलेली घोषणा, परंतु संबंधित आयुक्तांकडून त्याबाबतची होत असलेली चुकीची अंमलबजावणी, राज्यात शासकीय शाळा बंद पडण्याचे वाढलेले प्रमाण, ज्या शाळा सध्या सुरु आहेत त्या शाळेत संगणक, ग्रंथालय व क्रीडांगण त्याचप्रमाणे स्वच्छतागृहांची सोय नसणे, यात सुधारणा न केल्यास राज्यातील शासकीय मराठी शाळा हळूहळू बंद पडण्याची भीती व्यक्त करण्यात येत असणे, अशा परिस्थितीत गरीब पालकांच्या पाल्यांना शिक्षणापासून वंचित रहावे लागणे, यासाठी शासनाने यात तातडीने लक्ष घालून राज्यातील शासकीय शाळा सुरु ठेवण्याची व शाळांची संख्या वाढण्यासाठी तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता, ठाणे येथील रतनशी प्रेमजी चॅरिटेबल ट्रस्टने बेकायदेशीररित्या ट्रस्टच्या जमिनी विकणे, ट्रस्टच्या जागेचा वापर फक्त शैक्षणिक कारणास्तव करता येईल अशी तरतूद असणे परंतु या जमिनी विकासकांना विकून करण्यात आलेला भ्रष्टाचार, विकलेल्या काही जमिनी वन विभागाच्या सुद्धा असणे, या ट्रस्ट मध्ये मोठ्या प्रमाणात गैरकारभार सुरु असणे, ठाणे जिल्ह्यातील मुंब्रा, दिवा, कळवा तसेच कल्याण, डोंबिवली येथे मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे करण्यात आली असून संबंधित अधिकाऱ्यांच्या संगनमताने ही कामे झाल्याचा आरोप येथील नागरिकांनी करणे, या अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याची होत असलेली मागणी, राज्यात वाळू माफीयांकडून शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांवर करण्यात येत असलेले हल्ले यात बरेच अधिकारी व कर्मचारी गंभीर जखमी होणे, वाळू उपश्यावर बंधने असताना सुद्धा रात्री नदीतून प्रचंड प्रमाणात बेकायदा वाळू उपसा होत असून यावर कारवाई करण्याची होत असलेली मागणी, नवी मुंबई येथील टोरेस ज्वेलर्स या कंपनीने अधिक परतावा देण्याचे आमिष दाखवून राज्यातील नागरिकांचे करोडो रुपये बुडऊन केलेले

पलायन, अद्यापही नागरिकांचे पैसे परत केलेले नसणे, शासनाने यात लक्ष घालून गरीब नागरिकांचे पैसे परत मिळवून देण्याबाबत उपाययोजना करण्याची होत असलेली मागणी, राज्यात ऑक्टोबर २०२४ पर्यंत सायबर गुन्ह्यांच्या सुमारे २ लाख ४१ हजार तक्रारी नोंदविल्या गेल्या असणे, यामध्ये सर्वसामान्य जनतेचे कोट्यावधी रुपये बुडाले असल्याने कष्टाने कमविलेले पैसे जाण्याची भिती निर्माण होणे, शासनाच्या विविध विभागात वाढलेला भ्रष्टाचार, त्यास असलेला राजकीय वरदहस्त, मुंबई व ठाणे महानगरपालिकेतील विविध विकास कामात झालेले गैरव्यवहार, त्यांची चौकशी करण्याची होत असलेली मागणी, शासनाच्या विविध महामंडळात नियमबाह्यरित्या केलेल्या अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या, यामुळे पात्र अधिकाऱ्यांवर होत असलेला अन्याय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका लांबणीवर पडल्याने वाढलेला मनमानी कारभार, बुलढाणा जिल्ह्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेद्वारे वितरीत करण्यात आलेल्या निकृष्ट दर्जाच्या गव्हामुळे १८ गावातील लोकांच्या आरोग्यावर झालेला विपरित परिणाम, शासनाची परवानगी न घेता १३५० बसेस एस.टी महामंडळाने भाडेतत्वावर घेण्याचा घेतलेला निर्णय, त्यामुळे शासनाचे जवळपास दोन हजार कोटींचे नुकसान होण्याची शक्यता, यासाठी जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची होत असलेली मागणी, राज्यातील पोलिस यंत्रणेवर वाढत असलेले हल्ले त्यामुळे पोलिसांचे खचलेले मनोबल, पत्रकारांवर दाखल होत असलेले खोटे गुन्हे, त्यामुळे पत्रकारांचे ढासळलेले मनोबल, शासनातील जबाबदार व्यक्तींकडून होत असलेली बेताल वक्तव्ये, ज्यामुळे सामाजिक सलोखा बिघडत चाललेला असणे, महापुरूषांबाबत अपमानजनक वक्तव्ये करण्याची वाढलेली वृत्ती आणि त्याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, मुंबई, ठाणे, पुणे इत्यादि महानगर क्षेत्रातील सहकारी गृहनिर्माण संस्थांकडून दरवर्षी आकारण्यात येणारा अकृषि कर (N.A.Tax) रद्द करण्याची घोषणा शासनातर्फे ऑक्टोबर-नोव्हेंबर,२०२४ दरम्यान करण्यात येणे, परंतु अदयापही याबाबतचा शासन निर्णय काढण्यात न येणे, त्यातच महसूल विभागातर्फे सोसायट्यांना अकृषि कर (N.A.Tax) भरण्याबाबत काढलेल्या नोटीसा, त्यामुळे सहकारी संस्थामध्ये राहणाऱ्या सभासदांमध्ये पसरलेला असंतोष, मुंबईतील मालाड (पूर्व) दिंडोशी येथील नागरी निवारा प्रकल्पाची जमीन वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतरीत करताना १० टक्के ऐवजी १ टक्के शुल्क रक्कम आकारण्याची आवश्यकता, अकृषि कर (N.A.Tax) रद्द करण्याबाबत शासन निर्णय त्वरित काढण्याची आवश्यकता, वांद्रे (पूर्व) मतदार संघातील रेल्वेच्या अखत्यारीतील जागेची पुनर्मोजणी करण्याचा प्रस्ताव मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयाने महसूल विभागाकडे दिनांक २४ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्या सुमारास सादर करणे, पूर्वी केलेल्या मोजणीमध्ये राज्य शासनाची जागा रेल्वेची दाखविण्यात येणे, पुनर्मोजणीचा प्रस्ताव त्वरेने मंजूर करण्याची आवश्यकता, मुंबई महानगरपालिकेने दिनांक ८ जुलै, २०२५ पासून शहरातील सर्व बेकरी व रेस्टॉरंटमधील कोळश्यावर चालणाऱ्या तंदूर भट्टया कायमस्वरुपी बंद करण्याची व हरित ऊर्जेवर व्यवसाय सुरु ठेवण्याची अट टाकण्यात येणे, या अटीमुळे लहान व्यावसायिकांवर आर्थिक ताण येणार असल्यामुळे त्यांच्यात पसरलेले चिंतेचे वातावरण, अनेक कामगार बेकार होण्याची शक्यता, सदर निर्बंध मागे घेण्याची व्यावसायिकांनी केलेली मागणी, राज्यातील महागाई, बेरोजगारी यासारख्या मूलभूत प्रश्नांकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, विविध महापुरुषांची स्मारके उभारण्याबाबत शासनाने केलेल्या घोषणा परंतु

त्याची न झालेली अंमलबजावणी, राज्यात गुंतवणूक करण्यास इच्छूक असलेल्या उद्योजकांना स्थानिक गुंडांद्वारे होत असलेला त्रास, ज्यामुळे उद्योजकांमध्ये पसरलेले भितीचे वातावरण, यावर शासनाने करावयाची कारवाई व करावयाची उपाययोजना."

**चौदा : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(गुरुवार, दिनांक २० मार्च, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (क्रमांक १ ते ७)**

**(१) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्य दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) मुंबईसह ठाणे, नवी मुंबई आणि सोलापूर, नाशिक जिल्ह्यात विशेष मोहीम राबवून ४३ बांगलादेशी घुसखोरांना अटक केल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास येणे, तसेच अवघ्या पाचशे ते दोन हजार रुपयात भारतीय ओळखपत्र आणि इतर आवश्यक कागदपत्रे बनवत असल्याचेही निदर्शनास येणे, त्यामध्ये अटक केल्यानंतर त्यांना मायदेशी पाठवण्याच्या प्रक्रियेला अनेक वर्षे लागत असणे, त्यामुळे बांगलादेशी घुसखोरांच्या प्रवेशावर संपूर्ण आळा घालण्यासाठी ठोस कारवाई करण्याची गरज असणे, त्यामुळे घुसखोरीला आळा घालण्यासाठी राज्यात विशेष यंत्रणा तैनात करण्याबाबत तसेच अटक केलेल्या बांगलादेशींना लवकरात लवकर मायदेशी पाठवण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया. "

**(२) श्री.अमित देशमुख, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"वलांडी प्राथमिक आरोग्य केंद्रात दररोज ३० ते ३५ गावांतील नागरिक उपचारासाठी येत असणे, सदर प्राथमिक आरोग्य केंद्रात तीन वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या पदांपैकी दोन पदे, परिचर आणि सफाई कर्मचाऱ्यांची पदेही रिक्त असणे, वलांडी ग्रामपंचायतीने एक वर्षापूर्वी ग्रामीण रुग्णालय मंजुरीसाठी नव्याने प्रस्ताव पाठविणे, जिल्हा नियोजन समिती आणि जिल्हा परिषदेनेही मंजुरीसाठी प्रस्ताव पाठविण्यात आलेला असणे, शवविच्छेदन खोलीत विद्युत पुरवठ्याची सोय नसल्याने गैरसोय होत असणे, महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागातील नागरिकांना उपचारासाठी लांबचा प्रवास करावा लागत असणे, तसेच लातूरसह राज्यातील अनेक जिल्ह्यातील ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य केंद्र उभारणीचे सरकारने धोरण आखणे गरजेचे असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) श्री. भीमराव तापकीर, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"पुणे-मुंबई-बंगळुरू महामार्ग हा अत्यंत वर्दळीचा असून वाहतुकीची मोठी कोंडी तसेच अपघातांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असणे, महामार्गाच्या अपुऱ्या रूंदीमुळे आणि वाहतुकीच्या वाढत्या प्रमाणामुळे प्रवाशांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान व हाल होत असणे, महामार्गाच्या सहापदरीकरणाचा प्रस्ताव अनेक वर्षांपासून प्रलंबित असून त्याच्या अंमलबजावणीला त्वरित गती देण्याची तसेच अपघात रोखण्याच्या दृष्टीने तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(४) डॉ. नितीन राऊत, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"विदर्भातील अनेक तालुक्यात अनेक दुर्गम आदिवासी पाडे येत असल्यामुळे तेथे पावसाळयात जाणे शक्य होत नसणे, या दुर्गम आदिवासी पाडयांमध्ये अनेक विद्यार्थी प्रतिकूल नैसर्गिक परिस्थितीमुळे शिक्षणापासून वंचित रहात असणे, पावसाळयात येथील नदी-नाल्यांना पूर येत असल्यामुळे या विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे यासाठी शासनाने काही निवासी शाळा सुरु करणे, येथे विद्यार्थी उत्तम शिक्षण घेत असले तरी त्यांचे बालपण हिरावून घेतले जात असणे, विद्यार्थ्यांना कुटुंबापासून दूर रहावे लागत असणे, याउलट जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थी दुपारी घरी गेल्यानंतर आई-वडील व कुटुंबियांसोबत वेळ घालवत असल्याने त्यांची आकलन क्षमता निवासी शाळांतील विद्यार्थ्यांपेक्षा अधिक असणे, त्यामुळे दुर्गम भागातील आदिवासी पाडे व गावांमधील विद्यार्थ्यांना घराजवळच दर्जेदार शिक्षण घेता यावे, त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणता यावे, यासाठी अशा भागातील जिल्हा परिषद शाळा टिकवून ठेवण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(५) श्री. हारुन खान, वि.स.स.**

"मुंबई महानगरपालिकेने वर्सोवा-भाईंदर किनारपट्टी मार्गासाठी आवश्यक परवानगी न घेता ठेकेदारांना सदरची कंत्राटे दिल्याबाबत" या विषयावरील श्री. भास्कर जाधव व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक २७ ला दिनांक ०७ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(६) श्री. मनोज जामसुतकर, वि.स.स.**

"राज्यातील अनेक जिल्ह्यांत बिबटे व वाघांचे होणारे मृत्यू रोखण्याबाबत" या विषयावरील श्री. प्रतापराव पाटील चिखलीकर व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ७५० ला दिनांक ०६ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चेची सूचना उपस्थित करतील."

**(७) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.**

"कोसंबी रिठ (ता.पोभुर्णा, जि.चंद्रपूर) येथील शेतकऱ्यांना एमआयडीसी करिता संपादित केलेल्या जमिनींचा मोबदला देणेबाबत" या विषयावरील श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ९१३ ला दिनांक ०५ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चेची सूचना उपस्थित करतील.

**अशासकीय कामकाज**

**(बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)**

**पंधरा : अशासकीय विधेयके :-**

**(अ) पुर:स्थापनार्थ :**

**(१)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३ - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री.महेश लांडगे, वि.स.स. यांचे**

**(२)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८ - महाराष्ट्र धर्मांतर बंदी विधेयक, २०२५ - **श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे**

**(३)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ - बियाणे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**(४)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १४ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**(५)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १५ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**(६)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १६ - महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध (सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

अप्रकाशित

(७) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १७ - महाराष्ट्र जमीन महसुल संहिता (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

(८) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १८ - महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) (सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

(९) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १९ - मुंबई महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे**

(१०) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक २० - महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

(११) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ - बाल कामगार (प्रतिबंध आणि विनियमन) (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

(१२) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६ - महाराष्ट्र अल्पभूधारक शेतकरी निवृत्ती वेतन देण्याबाबत विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

(१३) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ - महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

(१४) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० - महाराष्ट्र धूम्रपानास व थुंकण्यास मनाई करण्याबाबत विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**(ब) विचारार्थ :**

(१) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ - महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

(२) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ - महाराष्ट्र दारुबंदी (सुधारणा) विधेयक, २०२५ - **सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे**

अप्रमाणित

**(३)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ - कारागृहे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**(४)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ - मोटार वाहन (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २० मार्च, २०२५

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा

असुधारित